



# गोदातीर समाचार

RNI No.6331/62
REGD.NO. G2/RNP/NND-27/2024-2026

संपादक : केशव घोणसे पाटील
www.godateer.com





* वर्ष ६५ वे * अंक २५० * नांदेड * शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर २०२६ * पृष्ठे ६ * किंमत २ रुपये ☎: 255777, Fax :252211

# मनोज जरांगे यांचं उपोषण स्थगित, आंदोलन सुरुच राहणार!

## ▸ दोन मंत्र्यांसह चौघांच्या शिष्टाईला यश
## ▸ राज्य सरकारला तीन महिन्यांचा वेळ



**मुंबई (प्रतिनिधी)–** अंतरवाली सराटीहून मुंबईकडे निघालेल्या मनोज जरांगे पाटील यांना सरकारच्या दोन मंत्र्यांसह चौघांच्या शिष्टामंडळाने भेट घेतली. यानंतर जरांगे यांनी उपोषण स्थगित केले असून आंदोलन सुरू राहणार अशी घोषणा केली. तसेच सरकारला तीन महिन्यांचा वेळ दिला आहे.

जालनामधील अंतरवाली सराटीहून मुंबईच्या दिशेने निघालेले मराठा आंदोलनकर्ते मनोज जरांगे पाटील यांची सरकारचे शिष्टमंडळ बीडमधील पाटोदा येथे भेट घेतली. यामध्ये मंत्री राधाकृष्ण विखे, मंत्री दादा भुसे, आमदार प्रसाद लाड, आमदार सुरेश धस, बीड जिल्हाधिकारी यांनी मनोज जरांगे यांच्यासोबत संवाद साधला. यानंतर मनोज जरांगे यांनी सरकारला ९० दिवसांची मुदत दिली. ३ महिन्यांत सातारा गॅझेट लागू करा. सरकारला ३ महिन्यांचा वेळ देतो. जर सरकारने धोका दिला, तर आम्ही मुंबई गाठणार, असा इशाराही मनोज जरांगे यांनी दिला. मी आज उपोषण स्थगित करतो, मात्र आंदोलन सुरुच राहणार, असं मनोज जरांगे यांनी स्पष्ट केलं. तसेच मुंबईत गेलेल्या १ लाख ०७ हजार समर्थकांनी माघारी यावं, असं आवाहन देखील मनोज जरांगेंनी केलं.

५८ लाख नोंदी कमी होणार नाही, याची खात्री द्या. नोंदी शोधण्यासाठी आम्ही माणसं देतो. शिंदे समिती काम करत नाही आणि सरकारही लक्ष देत नाही. हे आंदोलन यशस्वी झाल्याशिवाय थांबणार नाही. ही लढाई थांबणार नाही, मी उपोषण सोडणार नाही. आम्हाला आश्वासन दिलं, तरी आंदोलन सुरु राहणार, असं मनोज जरांगे म्हणाले. तसेच सातारा गॅझेट लागू करण्यासाठी तीन महिने देतो, असंही मनोज जरांगेंनी सांगितले. मराठा समाजाला खुन्नस देणं चांगलं नाही. राधाकृष्ण विखे चुकत असले तरी त्यांच्यावर प्रेम करा. एकनाथ शिंदेंवरही प्रेम करु पण आता नाही. मंत्र्यांनी टीका केली तर आम्ही गप्प बसणार नाही, असं मनोज जरांगे म्हणाले. मराठा समाजाला खुन्नस देणं चांगलं नाही. चर्चा न करणारे आज चर्चेसाठी आले की नाही?, आरक्षणापेक्षा समाजाची इज्जत महत्वाची आहे, असंही मनोज जरांगेंनी सांगितले.

सातारा गॅझेट बाबत ११०० पानांचा अहवाल आहे. याबाबत ३ ते ४ महिन्यात आम्ही कारवाई करू. अभ्यासासाठी यात वेळ हवा आहे. हैद्राबाद गॅझेटबाबत याचिका सध्या न्यायालयात प्रलंबित आहे. यामध्ये हैद्राबाद गॅझेटच्या जीआरला स्थगिती मिळणार नाही. याची काळजी घेतली जाईल, असं राधाकृष्ण विखे-पाटील म्हणाले. यावर मराठा समाजालाच का डावललं जातंय? सातारा, कोल्हापूर, पुणे, औंधचं गॅझेटियर लागू करा, असं मनोज जरांगेंनी सांगितले. जीआर काढून गॅझेटियरची अंमलबजावणी करावी लागेल. ५८ लाख नोंदी सापडल्या. त्यातली एकही कमी व्हायला नको. नोंदी कमी करणार नाही, याची लेखी हमी द्यावी, असं मनोज जरांगे म्हणाले.

# मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन उत्साहात साजरा; पालकमंत्र्याच्या हस्ते मुख्य ध्वजारोहण

## पीक नुकसानीची शासन दखल घेणार, शेतकऱ्यांना मदतीची ग्वाही –पालकमंत्री सावे

**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात यंदा अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पिकांचे नुकसान झाले आहे. या परिस्थितीची शासन दखल घेऊन शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी योग्य ती कार्यवाही करण्यात येईल. कमी पावसामुळे निर्माण झालेल्या परिस्थितीत शेतकरी बांधवांसाठी आवश्यक उपाययोजना करण्याची शासनाच्यावतीने ग्वाही देतो, असे प्रतिपादन राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त माता गुजरीजी विसावा उद्यान येथे पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते मुख्य शासकीय ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी आयोजित कार्यक्रमात ते बोलत होते. प्रारंभी पालकमंत्री अतुल सावे व मान्यवरांच्या हस्ते हुतात्मा स्मारकाच्या स्मृतिस्तंभास पुष्पचक्र अर्पण करून हुतात्म्यांना आदरांजली वाहण्यात आली. यावेळी पोलीस पथकाने धून वाजवून हवेत बंदुकीच्या तीन फैरी झाडत मानवंदना दिली. पालकमंत्र्यांनी मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त सर्वांना मनःपूर्वक शुभेच्छा दिल्या.

यावेळी राज्यसभेचे सदस्य तथा राज्याचे माजी मुख्यमंत्री अशोक चव्हाण, खासदार प्रा. रविंद्र चव्हाण, आमदार अमरनाथ राजूरकर, आमदार बालाजी कल्याणकर, आमदार भीमराव केराम, विशेष पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे, अपर पोलीस अधीक्षक सूरज गुरव, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर यांच्यासह ज्येष्ठ स्वातंत्र्यसैनिक, नागरिक व पत्रकार आदी उपस्थित होते.

राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या नेतृत्वाखालील शासनाने जाहीर केलेल्या पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना-२०२६ ची नांदेड जिल्ह्यात प्रभावी अंमलबजावणी सुरू आहे. जिल्ह्यातील २ लाख २४ हजार ४८७ शेतकऱ्यांची माहिती संकेतस्थळावर नोंदविण्यात आली असून, त्यापैकी ६४ हजार २७९ शेतकऱ्यांच्या खात्यांवर आतापर्यंत ४८८ कोटी १९ लाख रुपयांची कर्जमाफीची रक्कम जमा करण्यात आली आहे. पात्र शेतकरी लाभापासून वंचित राहू नयेत, यासाठी कृषी क्षेत्रातील ग्रीस्टॅक नोंदणी आणि आधार प्रमाणीकरण पूर्ण करण्याचे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले. कर्जमाफीचा लाभ मिळालेल्या



शेतकऱ्यांना कर्जफेडीचे ना-देय प्रमाणपत्र देण्यात येत असून, बँकांनी त्यांना तातडीने नवीन पीककर्ज उपलब्ध करून द्यावे, असेही त्यांनी सांगितले.

शेतकऱ्यांना कर्जमुक्तीबरोबरच वीजबिलात सवलत देण्याचा महत्त्वपूर्ण निर्णय शासनाने घेतला आहे. कर्जाचा भार कमी करणे आणि शेतीसाठी लागणाऱ्या वीज खर्चात दिलासा देणे, हे शेतकऱ्यांच्या आर्थिक स्थैर्यासाठी महत्त्वाचे आहे. या निर्णयांबद्दल मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे आणि उपमुख्यमंत्री सुनेत्राताई पवार यांचे अभिनंदन करून नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांच्यावतीने पालकमंत्र्यांनी आभार मानले.

जिल्ह्यात यंदाच्या खरीप हंगामात ९७ टक्के पेरणी पूर्ण झाली आहे. मात्र, अल निनोच्या प्रभावामुळे पावसाचे प्रमाण कमी राहिल्याने पिकांचे नुकसान झाले आहे. या परिस्थितीत शेतकऱ्यांना मदत करण्यासाठी शासन योग्य ती कार्यवाही करणार असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. प्रधानमंत्री पीक विमा योजनेअंतर्गत ९६६ कोटी रुपयांचे, तर प्रधानमंत्री किसान सन्मान निधी योजनेच्या २३ व्या हप्त्यापोटी ७६ कोटी ५३ लाख रुपयांचे वितरण करण्यात आले आहे. यामुळे शेतकऱ्यांना आर्थिक दिलासा मिळाला असल्याचे पालकमंत्री सावे यांनी सांगितले.

# जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते ध्वजारोहण



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त जिल्हाधिकारी कार्यालयाच्या परिसरात जिल्हाधिकारी राहुल कर्डिले यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला सलामी देऊन अभिवादन करण्यात आले.

या ध्वज वंदन कार्यक्रमास निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, उपजिल्हाधिकारी (सामान्य) अजय शिंदे, उपजिल्हा निवडणूक अधिकारी राजकुमार माने, तहसीलदार शंकर लाड, विपीन पाटील यांच्यासह सर्व विभागाचे अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नांदेडमध्ये दुर्गंधीयुक्त कचऱ्याची उघड्यावर वाहतूक; ३ हायवांवर गुन्हा

## नांदेड जिल्ह्यातील पहिली घटना



**नांदेड (प्रतिनिधी)–** मानवी आरोग्य आणि जीवितास धोका निर्माण होईल, अशा प्रकारे उघड्यावर व निष्काळजीपणे दुर्गंधीयुक्त कचऱ्याची वाहतूक करणाऱ्या ३ हायवा वाहनांवर नांदेड ग्रामीण पोलिसांनी कारवाई करत चालक, मालक आणि संबंधित कचरा डेपो चालकाविरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी रात्री नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे गुन्हे शोध (डीबी) पथक हद्दीत गस्त घालत असताना, सिडकोकडून काही हायवा वाहने क्षमतेपेक्षा जास्त कचरा भरून, कोणतीही ताडपत्री न झाकता नेत असल्याचे निदर्शनास आले. कचऱ्यातील पॉलीथिन, कपड्यांचे तुकडे, माती व चिखल रस्त्यावर सांडत होता. यामुळे वाहतुकीला अडथळा निर्माण होत असून नागरिकांच्या आरोग्यास गंभीर धोका निर्माण झाला होता.

पथकाने आरटीओ कार्यालयासमोर ही वाहने थांबवून चौकशी केली असता हायवा क्र. (एमएच २६ बीडी ७७१७) चालक प्रज्वल सदाशिव दुधमल (वय २१, रा. धानोरा, ता. पूर्णा, जि. परभणी), मालक गजानन किसनराव हंबर्डे (रा. विष्णुपुरी, नांदेड) हायवा क्र. (एमएच ०१ सीव्ही २३९७) चा चालक शिवलिंग संभाजी संगेकर (वय ३६, रा. लालवाडी, नांदेड), मालक पवन पांडुरंग काळे (रा. जुना कौठा, नांदेड), हायवा क्र. (एमएच ४० बीएल ६१०५) नरहरी नामदेव धुतराज (वय ४९, रा. जानापुरी, ता. लोहा), मालक सदानंद संजय पुयड (रा. पुणेगाव, नांदेड) या चालकांकडे कचरा वाहतुकीचा कोणताही वैध परवाना आढळला नाही. सदर कचरा महानगरपालिका डम्पिंग डेपोमधून डेरला फाटा येथील खदाणीत विल्हेवाट लावण्यासाठी नेला जात असल्याचे तपासात निष्पन्न झाले.

याप्रकरणी तिन्ही चालक, मालक आणि कचरा डेपो संबंधितांविरुद्ध नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्यात गु.र.नं. १२०९/२०२६, कलम १२५, २८० भारतीय न्याय संहिता अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही कामगिरी पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन, अपर पोलीस अधीक्षक सुरज गुरव यांच्या मार्गदर्शनाखाली नांदेड ग्रामीण पोलीस ठाण्याचे प्रभारी अधिकारी ओमकांत चिंचोलकर, पोउपनि आनंद चव्हाण व त्यांच्या पथकातील अंमलदार राजू जेंकट, गुरुनाथ कारामुंगे, जमीर जाधव व हनवता कदम यांनी पार पाडली.

# उपमुख्यमंत्री शिंदेंच्या हेलिकॉप्टरमध्ये अचानक तांत्रिक बिघाड; उड्डाण रद्द

**अहमदाबाद (प्रतिनिधी)–** महाराष्ट्राचे उपमुख्यमंत्री आणि शिवसेनेचे मुख्य नेते एकनाथ शिंदे सध्या गुजरात दौऱ्यावर आहेत. या दौऱ्यादरम्यान त्यांच्या हेलिकॉप्टरमध्ये तांत्रिक बिघाड झाल्याची माहिती समोर आली आहे. वडनगरहून अहमदाबादला जाण्यापूर्वी हेलिकॉप्टरमध्ये काही तांत्रिक अडचण आढळून आली. त्यामुळे हेलिकॉप्टरचे उड्डाण रद्द करण्यात आले आणि शिंदे रस्तेमार्गे अहमदाबादच्या दिशेने रवाना झाले.

उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे गुरुवारी वडनगरमध्ये आयोजित कार्यक्रमासाठी उपस्थित होते. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त आयोजित 'सेवा संकल्प अभियाना'च्या कार्यक्रमात शिंदे सहभागी झाले. यावेळी केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, गुजरातचे मुख्यमंत्री भूपेंद्र पटेल यांच्यासह अनेक नेते उपस्थित होते. वडनगरहून वाराणसीच्या दिशेने जाणाऱ्या बाइक रॅलीला देखील यावेळी हिरवा झेंडा दाखवण्यात आला.



गोदातीर समाचार

**आज गौरी पूजन**

गौरी पूजनानिमित्त सर्वांना हार्दिक शुभेच्छा!

**–मुख्य संपादक**

**सुट्टीची सूचना**

आज गौरी पूजनानिमित्त कार्यालयास सुट्टी असल्याने उद्या दि. १९ सप्टेंबर २०२६ रोजीचा गोदातीर समाचारचा अंक प्रकाशित होणार नाही. वाचक, जाहिरातदार, एजंट यांनी याची नोंद घ्यावी.

**– व्यवस्थापक**

# पालकमंत्र्यांनी घेतला पीक परिस्थिती, पर्जन्यमान, पाणीसाठ्याचा आढावा

## दुष्काळसदृश्य परिस्थितीत शेतकऱ्यांच्या पाठीशी शासन खंबीरपणे उभे –पालकमंत्री सावे

**नांदेड (प्रतिनिधी)–** दुष्काळसदृश्य परिस्थितीत शासन शेतकऱ्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे असून, नांदेड जिल्ह्यातील शेतकऱ्यांना आवश्यक ती मदत मिळवून देण्यासाठी शासनस्तरावर पाठपुरावा करण्यात येईल, असे राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण, दुग्धविकास, अपारंपरिक ऊर्जा व दिव्यांग कल्याण मंत्री तथा नांदेड जिल्ह्याचे पालकमंत्री अतुल सावे यांनी सांगितले.

नांदेड जिल्ह्यातील दुष्काळसदृश्य परिस्थितीचा पालकमंत्री अतुल सावे यांनी आढावा घेतला. यावेळी आमदार बाबूराव कदम कोहळीकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलभ रोहन, निवासी उपजिल्हाधिकारी किरण अंबेकर, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी दत्तकुमार कळसाईत, महावितरणचे अधीक्षक अभियंता




अजितकुमार खंदारे, ग्रामीण पाणी पुरवठा विभागाचे कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, जिल्हा पशुसंवर्धन उपायुक्त डॉ. सखाराम खुणे, विष्णुपुरीचे कार्यकारी अभियंता व्ही. आर. बनसोड, उर्ध्व पेनगंगा प्रकल्पाचे अधीक्षक अभियंता, जिल्हा परिषदेचे कृषि विकास अधिकारी, यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी उपस्थित होते.

पालकमंत्री अतुल सावे यांनी जिल्ह्यातील पीक परिस्थिती, पर्जन्यमान, पाणीसाठा आणि नियमित वीजपुरवठ्याचा सविस्तर आढावा घेतला. पावसाचा खंड तसेच पावसातील अनियमिततेचा सर्वाधिक परिणाम सोयाबीन, कापूस आणि तूर या पिकांवर झाला आहे. पावसाअभावी पिकांची वाढ खुंटली असून, पिकांच्या संभाव्य नुकसानीची परिस्थिती लक्षात घेऊन आवश्यक उपाययोजनांबाबत यावेळी चर्चा करण्यात आली.

दुष्काळसदृश्य परिस्थितीत संभाव्य उद्भवणारी परिस्थिती लक्षात घेऊन सर्व संबंधित विभागांनी परस्पर समन्वयाने काम करावे. नागरिकांना तसेच शेतकऱ्यांना कोणत्याही प्रकारची अडचण निर्माण होऊ नये, यासाठी आवश्यक नियोजन व उपाययोजना आतापासूनच कराव्यात, अशा सूचना पालकमंत्री अतुल सावे यांनी संबंधित अधिकाऱ्यांना दिल्या.

यावेळी त्यांनी जिल्ह्यातील धरणांमधील पाणीसाठा तसेच आगामी काळातील पिण्याच्या पाण्याची उपलब्धता याचाही आढावा घेतला. पिण्याच्या पाण्याचे योग्य नियोजन करून उपलब्ध पाणीसाठ्याचा काटकसरीने वापर करण्याबाबत आवश्यक नियोजन करण्याच्या सूचनाही त्यांनी दिल्या.




# मुक्तिसंग्राम दिन व विद्यापीठाचा वर्धापन दिन उत्साहात साजरा



**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आणि स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त विद्यापीठ परिसरात विविध कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले. या निमित्ताने आयोजित ध्वजारोहण समारंभात विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांच्या हस्ते राष्ट्रीय ध्वज तसेच विद्यापीठ ध्वजाचे ध्वजारोहण करण्यात आले. विद्यापीठाच्या ३२ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून ३२ झाडे, तर मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनाच्या ७९ व्या वर्धापन दिनानिमित्त ७९ झाडे, अशी एकूण १११ झाडांची लागवड विद्यापीठ परिसरात करण्यात आली आहे.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिन आणि विद्यापीठाच्या ३२ व्या वर्धापन दिनानिमित्त कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी उपस्थितांना शुभेच्छा दिल्या. यावेळी त्यांनी विद्यापीठाची शैक्षणिक, संशोधनात्मक व प्रशासकीय क्षेत्रातील विकासाच्या दिशेने सुरू असलेली वाटचाल यावर थोडक्यात भाष्य केले. विद्यापीठाच्या प्रगतीसाठी सर्व अधिकारी, कर्मचारी, शिक्षक आणि विद्यार्थ्यांनी एकजुटीने योगदान देण्याचे आवाहन त्यांनी केले.

ध्वजारोहणसमारंभानंतर विद्यापीठ परिसरात वृक्षारोपण कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कुलगुरू डॉ. मनोहर चासकर, प्र-कुलगुरू डॉ. अशोक महाजन यांच्यासह उपस्थित मान्यवरांच्या हस्ते या वृक्षारोपण उपक्रमाचा शुभारंभ करण्यात आला. विद्यापीठ परिसर अधिक हिरवाईने नटावा, पर्यावरणाचा समतोल राखला जावा आणि भावी पिढ्यांना स्वच्छ व सुंदर परिसर मिळावा, या उद्देशाने या उपक्रमाला विशेष महत्त्व देण्यात आले.




**नांदेड :** शिवाजीनगर येथील बालवीर गणेश मंडळात गुरुवारी श्री गणरायाची आरती माजी मुख्यमंत्री खा. अशोकराव चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त 'एक दिवा आशीर्वादाचा' लावून त्यांना दीर्घायुष्य लाभावे, अशी प्रार्थनाही करण्यात आली. याप्रसंगी मंडळाच्यावतीने आमदार अमरनाथ राजूरकर आणि भाजप महानगर सरचिटणीस विजय येवनकर यांनी अशोकराव चव्हाण यांचा सत्कार केला. यावेळी किशोर स्वामी, अमितसिंह तेहरा, दिनेश बाहेती, आनंदराव हेंद्रे, अनिलसिंह हजारी, दिनेश यादव, संतोष मानधने, आशुतोष राजूरकर, मोहित बाहेती यांच्यासह पदाधिकारी व भाविक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

जे जे आपणासी ठावे, ते ते इतरांसी सांगावे
शहाणे करूनी सोडावे, सकल जन

संस्थापक संपादकः
कै. दैविदासराव रसाळ

गोदातीर समाचार

संपादक
केशव घोणसे पाटील

# पावसाचा खंड अन् दुष्काळच दुष्काळ!

महाराष्ट्राच्या शेतीसमोर पुन्हा एकदा संकटाचे काळे ढग जमा झाले आहेत. आभाळाकडे डोळे लावून बसलेल्या शेतकऱ्यांच्या पदरी यंदाही चिंता येण्याची चिन्हे दिसत आहेत. राज्यातील १९ जिल्ह्यांमधील ८३ तालुक्यांत २० दिवसांपेक्षा अधिक काळ पावसाचा खंड पडला असून, काही भागांत हा खंड ३० दिवसांहूनही अधिक आहे. खरीप हंगामासाठी हा केवळ हवामानाचा बदल नाही, तर हजारो शेतकरी कुटुंबांच्या आर्थिक भवितव्याचा प्रश्न आहे. नांदेड, बीड, लातूर, धाराशिव, परभणी, हिंगोली, सोलापूर, अकोला, वाशिम, अमरावती, वर्धा, नागपूर आणि चंद्रपूर यांसह अनेक जिल्ह्यांत पावसाची तूट चिंताजनक आहे. मराठवाड्यातील हलक्या जमिनीवरील सोयाबीन, मूग, उडीद आणि कापूस सुकले आहेत. सोयाबीनवर पिवळा मोझॅक रोगाचा प्रादुर्भाव ही चिंता आणखी वाढवणारी बाब आहे. पश्चिम महाराष्ट्रातील कोरडवाहू पट्ट्यात मूग, उडीद, सोयाबीन, मका आणि बाजरीला पावसाच्या खंडाचा फटका बसत असून, उत्पादनात २० ते २५ टक्क्यांपर्यंत घट होण्याची शक्यता व्यक्त होत आहे. विदर्भातील सोयाबीन-कापूस उत्पादकही संकटात आहेत. या पार्श्वभूमीवर राज्य मंत्रिमंडळाच्या बैठकीत मुख्यमंत्री आणि मंत्र्यांनी चिंता व्यक्त केली, यंत्रणेला सतर्क राहण्याचे निर्देश दिले; परंतु शेतकऱ्यांसाठी प्रत्यक्ष मदतीचा निर्णय मात्र झालेला नाही. हीच बाब सर्वाधिक अस्वस्थ करणारी आहे. शेतकऱ्यांच्या शेतात पीक वाळत असताना शासनाच्या फाईली मात्र नियम, निकष आणि तारखांच्या चौकटीत फिरत राहिल्या, तर प्रशासनाच्या संवेदनशीलतेवर प्रश्नचिन्ह निर्माण होणार नाही काय? एनडीआरएफच्या निकषांनुसार नुकसानीचे पंचनामे ५ ऑक्टोबरनंतर करायचे असल्याचे सांगितले जाते. नियम आणि निकष आवश्यक आहेत; परंतु नैसर्गिक आपत्ती नियमपुस्तक पाहून येत नाही. पिकाचे नुकसान आज होत असेल, तर शेतकऱ्यांना गरजही आजच निर्माण होते. पंचनामे करण्यासाठी ठरावीक तारीख येईपर्यंत शेतकरी कर्जाचा हप्ता, बियाणे-खताचा खर्च, मजुरी आणि घरखर्च कसा भागवणार, याचे उत्तर प्रशासनाने द्यायला हवे. सरकारने घाईघाईने मदत जाहीर करावी, असा प्रश्न नाही; पण संकटाची पूर्वतयारी करणे ही सरकारची जबाबदारी आहे. प्रत्येक तालुक्यात पिकांची वस्तुनिष्ठ पाहणी, पावसाच्या खंडाची नोंद, पिकांच्या अवस्थेचे डिजिटल दस्तऐवजीकरण आणि संभाव्य नुकसानीचा प्राथमिक अंदाज आत्ताच घेता येऊ शकतो. अधिकृत पंचनाम्याची प्रक्रिया नियमानुसार नंतर झाली तरी पूर्वतयारीला कोणताही नियम अडथळा ठरू नये. विशेषतः मराठवाड्याकडे सरकारने वेगळ्या गांभीर्याने पाहण्याची गरज आहे. येथील जिल्ह्यांमध्ये पावसाचा खंड आणि हलक्या जमिनीवरील पिकांची स्थिती आधीच चिंताजनक आहे. शेतकरी कर्जबाजारीपणा, वाढता उत्पादन खर्च आणि बाजारभावाच्या अनिश्चिततेशी झुंजत असताना पावसानेही पाठ फिरवली, तर त्याचा परिणाम केवळ शेतावर होत नाही; संपूर्ण ग्रामीण अर्थव्यवस्थेवर होतो. दुष्काळाची घोषणा करणे किंवा न करणे हा प्रशासकीय निर्णय असू शकतो; परंतु दुष्काळासारखी परिस्थिती निर्माण होत असताना डोळे झाकून बसणे हा पर्याय असू शकत नाही. पाणी, चारा, पिकांचे संरक्षण, पीकविमा, कर्जवसुलीला दिलासा, वीजपुरवठा आणि आवश्यक ते संरक्षक सिंचन यांचा समन्वित आराखडा तयार करण्याची वेळ आता आली आहे. कोकणात परिस्थिती तुलनेने समाधानकारक असली तरी तेथेही काही भागांना पावसाची गरज आहे. म्हणजेच राज्यातील परिस्थिती एकसारखी नाही. त्यामुळे सरसकट धोरणाऐवजी जिल्हा आणि तालुकानिहाय परिस्थितीचा अभ्यास करून उपाययोजना करणे आवश्यक आहे. शेतकऱ्याला प्रत्येक वेळी आकाशाकडे पाहण्यास भाग पाडणे आणि पाऊस चुकला की मदतीसाठी शासनाच्या दारात उभे करणे, ही शेतीव्यवस्थेची शाश्वत पद्धत होऊ शकत नाही. हवामानातील अनिश्चितता वाढत असताना आपत्तीपूर्व नियोजन, जलसंधारण, सूक्ष्म सिंचन, पीक पद्धतीतील बदल आणि स्थानिक हवामानाच्या आधारे कृषी नियोजन यांना प्राधान्य द्यावे लागेल. आज प्रश्न केवळ पावसाचा नाही; प्रश्न आहे शेतकऱ्याच्या विश्वासाचा. सरकारने 'सतर्क राहा' असा आदेश दिला आहे. याचा अर्थ काय? मंत्र्यांनी केवळ पाहत राहणे, असा आहे का? आता त्या आदेशाचे रूपांतर प्रत्यक्ष कृतीत झाले पाहिजे. कारण शेतकऱ्यांच्या शेतात पाऊस कधी पडेल हे सरकार ठरवू शकत नाही; पण पाऊस दडी मारल्यावर शेतकऱ्याला एकटे सोडायचे की त्याच्या पाठीशी ठामपणे उभे राहायचे, हे सरकार नक्कीच ठरवू शकते.

# आत्मबलाने संकटावर मात करणे शक्य



कलकत्ता येथे स्वामी विवेकानंदांच्या घरा-जवळ राहणारे त्यांचे बालमित्र प्रियनाथसिंह यांना बालपणा-पासून नरेंद्र व्यक्तिमत्वाविषयी आकर्षण होते. त्यांच्या दैनंदिन सहवासामुळे त्यांचा पक्का विश्वास होत चालला होता, एक दिवस माझा मित्र थोर पुरुष होणार.थोर पुरुषाविषयी असणाऱ्या प्रत्येकाच्या कल्पना वेगवेगळ्या असू शकतात.जेंव्हा नरेंद्र संन्याशी झाले, तेंव्हा जीवलग मित्रांनी हळहळ व्यक्त करणे, काळजी करणे अगदी साहजिक होते. या व्यक्तीच्या बुद्धीवरून असे वाटत होते की, हा मोठा माणूस होईल, पण हा तर अगदी भगवे कपडे घालून सर्वसंगपरित्याग करणार.संन्यासी होऊन सर्वत्र भटकणार. आपल्या सहवासातील एक भावी कर्तृत्ववान माणूस वाया गेला म्हणून त्यांचे शेजारी मित्र हळहळ व्यक्त करीत होते.

पुढे शिकागो सर्वधर्मपरिषद आणि अमेरीकेत अनेक ठिकाणी वेगवेगळ्या विषयांवर त्यांच्या झालेल्या व्याख्यानाचे वृत्त मित्रांनी वृत्तपत्रातून वाचले. तेव्हा त्यांच्या मनात विचार आला, क्षेत्र कोणतेही असो, प्रज्वलित होणाऱ्या व्यक्तीला आपला दिव्य प्रकाश आणि त्याच्या आतील दिव्य दाहकता दाखविण्याची गरज नसते. ती सहजपणे प्रगट होते. सूर्य कापडाने झाकणे शक्य नसते, त्याप्रमाणेच स्वामीजींच्या अंतःकरणातील प्रज्वलित ज्वाला आता पूर्ण विश्वात पोहचणार याची खात्री त्यांना वाटू लागली. काही कालावधीने ते मायदेशी परतले. मद्रासमधील त्यांच्या व्याख्यानाचा प्रकाश भारतभर पोहचला होता. ती व्याख्याने प्रियनाथ सिंह वृत्तपत्रातून वाचायचे, आपले मनोगत व्यक्त करताना ते म्हणतात, हिंदू धर्मात एवढी श्रेष्ठ तत्वे आहेत आणि ती इतकी सुबोध करून सांगितली जाऊ शकतात हे मला नव्याने कळत होते. आपल्या मित्राच्या ठिकाणी अलौकिक सामर्थ्य वास करीत आहे. हा मानव ईश्वर रूप आहे, याबद्दल त्यांची खात्री झाली होती.

प्रियनाथ सिंह पुढे आपला अनुभव विशद करतात, अमेरिकेतून परतल्यावर स्वामीजी जेंव्हा कलकत्याला आले, तेंव्हा सर्वत्र उत्साह संचारला होता.राजा राधाकांत देव यांच्या निवास-स्थानी आपल्या सत्काराला उत्तर देताना विशाल जनसमुदायासमोर स्फुर्तिदायी वक्तव्य त्यांनी केले. त्याने प्रभावित होऊन कलकत्तावासीयांनी त्यांच्यावर स्तुतीचा वर्षाव केला. त्याने समस्त कलकत्तावासी भारावून गेले होते. मित्रांची अभिमानाने छाती भरून येणे अगदी साहजिक होते.

प्रियनाथ सिंह यांना खूप वाटायचे आपण आपल्या बालमित्राला भेटून परत एकदा तेव्हाच्या सर्व आठवणी काढाव्या. भरभरून मुक्त चर्चा करावी, पण हल्लीची वेळ अशी होती की त्यांना भेटणे सहज शक्य नव्हते. एकदा गंगेच्या बाजूला असणाऱ्या उद्यानात ते गेले. तेंव्हा त्यांच्या मुक्त संवादाला वाट मिळाली. बालवयातील आपल्या मित्रांसोबत ते अगदी मुक्तचर्चा करू लागले. अनेक लोक भेटावयास आल्याच्या सूचना मध्येच येत होत्या.तेंव्हा बाल मित्राशी बोलण्यासाठी ते आग्रही राहिले. सर्व बालमित्रांना खूप हायसे वाटले. आपला मित्र जरी जगात एवढे नाव करून परतला, तरी आपल्यासाठी तो आपला बालमित्र आहे. याविषयी सर्वांची खात्री पटली.

प्रियनाथसिंह यांनी प्रश्न विचारून मुक्त संवादाला सुरुवात केली. स्वामीजी आपण साधू आहात. तुमच्या स्वागतासाठी येथे निधी संकलनातून द्रव्यराशी उभी करण्यात आली. देशात सर्वत्र दुष्काळ असताना आपण आपल्या कलकत्ता आगमनापूर्वी, माझ्या स्वागतासाठी एक पैसाही खर्च करू नका, त्यापेक्षा तो निधी दुष्काळग्रस्तांना द्या, अशी आपली तार येईल, अशी आमची अपेक्षा होती, पण असे आपण काहीही केले नाही. प्रश्न स्वामीजींना अडचणीत आणणारा होता. प्रश्नातील युक्तिवाद लक्षात घेऊन नेमके कसे उत्तर द्यायचे? हा प्रश्न सर्वसामान्यां-समोर उभा झाला असता, कदाचित तो निरुत्तरही झाला असता, पण जिथे विवेक आणि आनंदाचा संगम आहे, तिथे उत्तर नाही किंवा प्रश्नकर्त्याचे समाधान होऊ शकणार नाही असे होणे शक्य नव्हते. स्वामीजी म्हणाले, गुरुदेव श्रीरामकृष्णाकडे लोक आकृष्ट व्हावेत.लोकांत उत्साह निर्माण व्हावा. त्यांच्या पुण्यनामाने नवतेजांचा संचार व्हावा.हा सर्व जयजयकार व सत्कार माझा नसून माझ्या गुरुदेवांच्या आहे. त्यामुळे लोकांना श्रीरामकृष्णाविषयी जाणून घेण्याची किती तृष्णा लागली आहे.लोकांनी त्यांच्या कार्याची महती जाणणे मानवी जीवन विकसित करण्यासाठी गरजेचे आहे. तसेच देशहितासाठी ते आवश्यक आहे. भारतमातेच्या हितासाठी ज्या महापुरुषांचे या पुण्यभूमीवर आगमन झाले, त्या विभूतीला मातेच्या या पुत्रांनी ओळखले नाही, तर त्यांच्या भविष्यात चांगले दिवस येण्याची शक्यताच नाही. श्रीरामकृष्ण कोण होते, त्यांची योग्यता काय? हे येथील लोक जेंव्हा जाणतील, तेंव्हा त्यांच्यातील माणूसपण जागे होईल. एकदा विचार, कृती, सदाचार, अध्यात्म, विज्ञान आणि देशप्रेम लोक जाणतील, त्याला जागतील, तेंव्हा दुष्काळाशी लढायला लोक सिध्द होतील आणि जेंव्हा कोणतेही संकट दूर करण्यासाठी लोक सिध्द होतात, तेंव्हा त्यांना दुष्काळासारखे संकट क्षुल्लक वाटेल. कोणत्याही संकटावर मात करण्यासाठी मनुष्याचे आत्मबल खूप महत्वाचे. ते आत्मबल आपल्यातील प्रत्येकाला गुरुदेव रामकृष्णाच्या प्रेरणेतून मिळेल. ती वातावरण निर्मिती माझ्यासाठी महत्वाची होती. माझे स्वागत, सत्कार ह्या गोष्टीला मी कवडीची किंमत देत नाही. हे स्वामीजींचे उत्तर एवढे परिपूर्ण आणि परिपक्व होते की त्याला आव्हान करणे मित्रांना शक्य नव्हते.

स्वामीजींनी पुढे सवांद सुरूच ठेवला, आपल्या देशात दुष्काळ कायमचा रहिवासी झाला. पिकावर रोग पडल्यावर जशी शेताची दुर्दशा होते तशी समाजाची झाली आहे. इतर देशात दुष्काळा-मुळे असे भीषण प्रश्न निर्माण झाले असे चित्र दिसत नाही, कारण त्या देशात माणसे राहतात. आपल्या देशातील माणसे ढेकळाप्रमाणे निष्क्रिय झाली आहेत. स्वामींनी हे विदारक सत्य सांगून किमान दीडशे वर्षे झाली होऊन गेली असतील.आजही आपल्या देशातील माणूस बदलला का? शासकीय नौकरशाही काम न करता वेतन घेण्यात धन्यता मानते. सदोदित डोक्यात भ्रष्टाचाराचा विचार ठेवून बेहिशोबी माया जमवून त्याला 'कमाई' असे गोंडस नाव देण्यात स्वतःला धन्य समजते. कष्टकरी श्रमिक कष्ट करायला तयार नाही. शासकीय सवलतीचा लाभ घेऊन आळसात दिवस घालविण्यात सुख मानतो. एकशे बेचाळीस कोटी लोकसंख्येच्या देशात श्रमजीवी काम करण्यासाठी श्रमिक सापडू नये, हा विदारक अनुभव आजचा शेतकरी बांधव घेतोय. या परिस्थितीविषयी कोणी काही बोलण्याचा प्रयत्न केला तर सर्वात मोठे गुन्हेगार, लुटारू म्हणून लोकप्रतिनिधी व उद्योजकाकडे बोट दाखविले जाते.लोकप्रतिनिधी किंवा उद्योजक आपली बाजू समर्थपणे मांडून असत्य पचविण्यात मास्टर माइंड आहेत, हे प्रखर वास्तव कुणीही नाकारू शकत नाही. त्यामुळेच स्वामीजींनी जो आग्रह धरला होता. कोणत्याही संकटावर मात करण्यासाठी संकुचित व स्वार्थी वृत्तीवर प्रहार झाला पाहिजे, त्याचा बिमोड होणे, त्या नाहीश्या होणे गरजेचे आहे. त्यासाठी लोकांना खऱ्या आध्यात्माच्या जवळ जाणे गरजेचे आहे. त्यातून लोक जेंव्हा निष्काम कर्मयोग सम जून घेतील, तेंव्हा ते आपल्यापेक्षा इतरांचा विचार अधिक करतील. इतरांच्या सुखदुःखात सहभागी होतील. माणूस म्हणून ते प्रगल्भ होतील.त्यांची ती प्रगल्भता मानवतेची उंची वाढवेल. उच्चतम मानवता मनुष्याला संकटावर मात करायला शिकविते. आजच्या या यंत्रयुगात आम्हाला त्या विचारांची गरज वाटत नाही. संकुचित व स्वार्थी प्रवृत्तीचे समर्थन करून अतिचलाखपणे जीवनक्रम जगणारे आम्ही यंत्रमहामानाव आहोत. त्यामुळेच स्वामीजी आपल्या मित्रांना सांगतात. मनुष्याने आध्यात्म जाणणे म्हणजे खऱ्याअर्थाने स्वतःला ओळखणे. युवक मित्रानो ही आपली ओळख निम र्ण करता आली तर आपल्या जीवनातील प्रत्येक संकटे आपल्याला अगदी क्षुल्लक वाटतील. आपला जीवनक्रम आनंददायी बनेल, आनंदी माणसे म्हणजे देशाची बावनकशी संपत्ती. त्या संपत्तीच्या बळावरच देश उभा करणे शक्य असते.

**-प्रा. वसंत गिरी**
मेहकर, जि. बुलडाणा
मो. ९०११२२९२३२

# सण नव्हे, इव्हेंट!

नुकताच झालेला दहीहंडीचा सण राज्यात मोठ्या उत्स-ाहात साजरा झाला. मात्र उंचच उंच दहीहंडी फोडताना अनेक ठिकाणी दुर्घटना होऊन त्यात अनेक गोविंदा जखमी झाले. गुरुवार रात्रीपर्यंत मुंबईतील जखमी झालेल्या गोविंदांची संख्या सव्वाशेच्या पुढे गेली. यातील काही गोविंदांना रुग्णालयात उपचार करून घरी सोडण्यात आले तर काही गोविंदा अजूनही रुग्णालयात उपचार घेत आहेत. त्यातील काही गोविंदा जबर जखमी आहेत. अर्थात दहीहंडी फोडताना गोविंदा जबर जखमी होणे हे काही याच वर्षी घडले असे नाही. दरवर्षी हेच चित्र पाहायला मिळते.

पूर्वी या उंचच उंच दहीहंडी फक्त पुणे, मुंबई, ठाणे या मोठ्या शहरातच पाहायला मिळत असे, मात्र अलीकडे हे लोण ग्रामीण भागातही पसरले आहे. ग्रामीण भागातही राजकीय नेते उंचच उंच दहीहंडी लावून हजारो रुपयांचे बक्षिसाचे आमिष दाखवून दहीहंडीचा इव्हेंट करुन राजकीय शक्तीप्रदर्शन करतात. मात्र या शक्तीप्रदर्शनात अनेक



गोविंदा जायबंदी होतात. राजकीय नेते गोविंदांचा विमा वगैरे शब्द वापरून तरुण गोविंदांना झुलवण्याचा प्रयत्न करतात, पण अपघात झाल्यानंतर कायमस्वरूपी अपंगत्व आल्यावर मिळणारी विम्याची रक्कम म्हणजे आयुष्याचे सार नव्हे! ऐन तारुण्यात जर कायमस्वरूपी अपंगत्व आले तर त्या तरुण गोविंदाची आणि त्याच्या कुटुंबाची काय अवस्था होईल याची कल्पनाही करवत नाही.

ऐन तारुण्यात वृद्ध आई वडिलांवर अवलंबून उर्वरित जीवन कंठण्याची वेळ त्यांच्यावर येते. अशा कायमस्वरूपी अपंगत्व आलेल्या तरुण गोविंदांना राजकीय नेते वाऱ्यावर सोडतात कारण त्यांचे शक्तिप्रदर्शन संपलेले असते. अर्थात हे शक्तिप्रदर्शन केवळ दहीहंडी पुरतेच मर्यादित असते असे नाही तर तर सर्व सणांमध्ये असते. वास्तविक सण उत्सव हा आपल्या संस्कृतीचा भाग आहे. जगात सर्वाधिक सण भारतात साजरे केले जातात मुळातच भारत उत्सवप्रिय देश आहे मात्र अलीकडे हे सण उत्सवातील पावित्र्य नष्ट होत चालले आहे.

ज्या उद्देशासाठी हे सण उत्सव साजरे केले जातात तो उद्देशच हरवला आहे आता हे सण उत्सव म्हणजे इव्हेंट बनले आहेत. कोणताही सण घ्या तो सण न राहता इव्हेंट बनला आहे मग तो दिवाळी असो की गणेशोत्सव. दिवाळीमध्येही फटाक्यांचे प्रदूषण आणि आगीच्या घटना घडतातच दिवाळी हा दिव्यांच्या सण आहे मात्र अलीकडे तो फटाक्यांच्या सण बनला आहे त्यामुळे ध्वनीप्रदूषणासोबतच वायू प्रदूषणही होते मात्र मोठ्या आवाजाचे प्रदूषण करणारे फटाके उडवून दिवाळी साजरी करण्याकडेच अनेकांचा कल असतो.

मागील काही वर्षात गणेशोत्सवाचे पावित्र्यही लोप पावले आहे. लोकमान्य टिळकांनी ज्या उद्देशाने सार्वजनिक गणेशोत्सव सुरू केला तो उद्देशच आपण विसरलो आहोत. गणेशोत्सवातील उंचच उंच मूर्तींची स्पर्धा, नवसाला पावणाऱ्या गणेश मंडळातील स्पर्धा यामुळे गणेशोत्सव सण आहे की स्पर्धा असा प्रश्न पडतो. गणेशोत्सव म्हणजे राजकीय नेत्यांना पक्षांना आपले शक्तिप्रदर्शन करण्याचे हक्काचे व्यासपीठ वाटते. गणेश ही बुद्धीची देवता मानली जात असताना बुद्धी गुंडाळून त्याची खरी आराधना भक्ती करताच येत नाही. नवरात्रीमध्येही हीच परिस्थिती असते एकूणच आज सणांचे स्वरूप पूर्ण पालटले आहे. त्यातील पावित्र्य नष्ट झाले असून आता सण उत्सव म्हणजे केवळ इव्हेंट बनले आहे. सण उत्सव म्हणजे राजकीय नेत्यांसाठी शक्तीप्रदर्शन करण्याचे व्यासपीठ बनले आहे.

**-श्याम ठाणेदार**
दौंड, जि. पुणे
मो. ९९२२५४६२९५

# परभणीत मटका बुकींवर डीआयजी पथकाच्या धाडी; १२ जणांवर कारवाई, ७५ हजारांचा मुद्देमाल जप्त

**नांदेड (प्रतिनिधी)-** परिक्षेत्रातील अवैध व्यवसायांना आळा घालण्यासाठी पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी विशेष पथक परभणी जिल्ह्यात रवाना केले होते.

या पथकाने दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी दोन ठिकाणी कारवाई केली आहे.

पहिली कारवाई : पोलीस ठाणे नानलपेठ हद्दीतील इटलापूर मोहल्ला येथे मुक्ताराम साखरे यांच्या घरात सुरू असलेल्या मटका बुकीवर छापा टाकून २९ हजार १५० रुपयांची रोख रक्कम व २७ हजार ४०० रुपये किमतीचे ४ मोबाईल असा एकूण ५६ हजार ५५० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी ७ इसमांविरुद्ध नानलपेठ पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६९६/२०२६, कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दुसरी कारवाई : नानलपेठ हद्दीतील सोना हॉटेल, जुना मोंढा येथे वैभव मोरे यांच्या पत्र्याच्या शेडमध्ये सुरू असलेल्या मटका बुकीवर कारवाई करून ७ हजार १० रुपयांची रोख व १२ हजार रुपये किमतीचे २ मोबाईल असा एकूण १९ हजार १० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला. या प्रकरणी ५ इसमांविरुद्ध नानलपेठ पोलीस ठाण्यात गु.र.नं. ६९७/२०२६, कलम ४, ५ महाराष्ट्र जुगार कायद्यान्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

दोन्ही कारवायांमध्ये मिळून एकूण १२ इसमांकडून ३६ हजार १६० रुपयांची रोख व ६ मोबाईल असा एकूण ७५ हजार ५६० रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

ही कारवाई पोलीस उपनिरीक्षक पंकज इंगळे, पोहेकॉ प्रदीप खानसोळे, पोहेकॉ गणेश राठोड, पोहेकॉ संदीप वाघाडे व पोहेकॉ गजानन डवरे यांनी पार पाडली. पथकाच्या उल्लेखनीय कामगिरीबद्दल पोलीस उपमहानिरीक्षक शहाजी उमाप यांनी अधिकारी व अंमलदारांचे अभिनंदन केले आहे.

'खबर' हेल्पलाईनवर माहिती द्या

अवैध व्यवसायांची माहिती थेट पोलिसांपर्यंत पोहोचावी यासाठी उपमहानिरीक्षक कार्यालयाने ९१ ५० १०० १०० हा मोबाईल क्रमांक असलेली मखबरफ हेल्पलाईन सुरू केली आहे. नागरिकांनी आपल्या भागातील अवैध व्यवसायांची माहिती या हेल्पलाईनवर द्यावी, असे आवाहन नांदेड परिक्षेत्राचे पोलीस उपम हानिरीक्षक शहाजी उमाप यांनी केले आहे.

# अखेर बीड-पुणे रेल्वेचा शुभारंभ

**बीड**-मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधत बीडकरांसाठी आजचा दिवस अत्यंत ऐतिहासिक व आनंददायी ठरला आहे. अनेक दशकांपासून प्रतीक्षेत असलेल्या 'बीड-पुणे' थेट रेल्वेसेवेचा आज राज्याच्या उपमुख्यमंत्री तथा बीड जिल्ह्याच्या पालकमंत्री सुनेत्रा पवार यांच्या हस्ते हिरवी झेंडी दाखवून शानदार शुभारंभ करण्यात आला.

# पत्रकार शशिकांत घोणसे पाटील यांना 'लातूर भूषण' पुरस्कार प्रदान

## पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, आ. अभिमन्यू पवार, विद्यानंद सागर महाराज यांच्या उपस्थितीत पुरस्कार वितरण






**लातूर(प्रतिनिधी)-**निर्भीड, अभ्यासू आणि लोकाभिमुख पत्रकारितेच्या माध्यमातून लातूर आणि मराठवाड्यातील विविध प्रश्नांना वाचा फोडणारे पत्रकार शशिकांत मधुकरराव घोणसे पाटील यांना मानाचा 'लातूर भूषण' पुरस्कार प्रदान करण्यात आला. मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून लातूर येथील दयानंद सभागृहात आयोजित गौरव सोहळ्यात पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले, सहकारमंत्री बाबासाहेब पाटील, स्वागताध्यक्ष भाजप आमदार अभिमन्यू पवार आणि विद्यानंद सागर महाराज यांच्या हस्ते शशिकांत पाटील यांचा सहकुटुंब सन्मान करण्यात आला.

महाराष्ट्र राज्य पत्रकार संघ, मुंबई यांच्या वतीने आयोजित या सोहळ्यात पत्रकारिता क्षेत्रासह पोलीस, सामाजिक, शैक्षणिक आणि इतर विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांचाही गौरव करण्यात आला.

यावेळी बोलताना पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी बदलत्या माध्यमविश्वात पत्रकारांची जबाबदारी अधिक वाढल्याचे सांगितले. इलेक्ट्रॉनिक मीडिया आणि सोशल मीडियाच्या माध्यमातून बातम्या प्रसारित करताना पत्रकारांनी अधिक जबाबदारीने आणि वस्तुनिष्ठपणे काम करणे गरजेचे असल्याचे त्यांनी नमूद केले. सध्या आर्टिफिशियल इंटेलिजन्स अर्थात 'एआय'चे युग असून, काहीजण खोडसाळपणे चुकीच्या बातम्या आणि माहिती पसरवत आहेत. त्यामुळे अशा चुकीच्या माहितीपासून समाजाने आणि माध्यमांनी सजग राहण्याची गरज असल्याचे मत पालकमंत्री भोसले यांनी व्यक्त केले. पत्रकारितेची विश्वासार्हता टिकवून ठेवण्यासाठी बातमीची सत्यता पडताळून पाहणे आणि जबाबदारीने ती समाजासमोर मांडणे आवश्यक असल्याचेही त्यांनी सांगितले. तर स्वागताध्यक्ष भाजप आमदार अभिमन्यू पवार यांनीही माध्यमांच्या बदलत्या स्वरूपावर भाष्य केले. इलेक्ट्रॉनिक आणि सोशल मीडियाच्या वाढत्या प्रभावा-मुळे प्रिंट मीडियालाही आपले अस्तित्व टिकवण्यासाठी संघर्ष करावा लागत आहे; मात्र आजही प्रिंट मीडियाची विश्वासार्हता कायम आहे, असे त्यांनी सांगितले. माध्यमांनी काळानुसार बदल स्वीकारतानाच विश्वासार्हता आणि पत्रकारितेची मूल्ये जपणे आवश्यक असल्याचेही आ. पवार यांनी नमूद केले.

शशिकांत घोणसे पाटील यांचा पत्रकारितेतील प्रवास प्रदीर्घ असून, वर्ष २००३ पासून त्यांनी 'झी २४ तास' या वृत्तवाहिनीसाठी १९ वर्षे काम केले. त्यानंतर दोन वर्षे 'टाईम्स नाऊ' या वृत्तवाहिनीसाठी त्यांनी योगदान दिले. गेल्या दोन वर्षांपासून ते 'न्यूज १८ मराठी'चे लातूर जिल्हा प्रतिनिधी म्हणून कार्यरत आहेत. तसेच गेल्या तीन वर्षांपासून आकाशवाणीचे जिल्हा प्रतिनिधी म्हणूनही ते कार्यरत आहेत.

शेतकरी, दुष्काळ, पाणीटंचाई, शिक्षण, सामाजिक प्रश्न, कायदा-सुव्यवस्था आणि विकासाच्या मुद्द्यांना सातत्याने प्रसिद्धी देत सर्वसामान्यांचे प्रश्न शासन आणि प्रशासनापर्यंत पोहोचविण्याचे काम त्यांनी केले आहे. त्यांच्या या दीर्घ पत्रकारिता कारकिर्दीची दखल घेत 'लातूर भूषण' पुरस्काराने त्यांचा गौरव करण्यात आला. दोन दशकांहून अधिक काळ समाजातील प्रश्नांना आपल्या पत्रकारितेतून आवाज देणाऱ्या शशिकांत घोणसे पाटील यांच्या कार्याचा 'लातूर भूषण' पुरस्काराने झालेला हा गौरव त्यांच्या पत्रकारिता प्रवासातील महत्त्वाचा सन्मान ठरला.

या सोहळ्यात पत्रकार शशिकांत घोणसे पाटील यांच्यासह पोलीस, सामाजिक, शैक्षणिक तसेच अन्य विविध क्षेत्रांत उल्लेखनीय कार्य करणाऱ्या मान्यवरांना पुरस्कार देऊन गौरविण्यात आले. महाराष्ट्र राज्य पत्रकार संघाचे पदाधिकारी, पत्रकार, विविध क्षेत्रांतील मान्यवर, मित्रपरिवार आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# शिक्षणव्यवस्था अधिक विद्यार्थीकेंद्री करणार -कुलगुरू डॉ. मनोहर चासकर

## 'विद्यार्थ्यांना अपेक्षित शिक्षणव्यवस्था' विषयी पीपल्समध्ये परिसंवाद



**नांदेड (प्रतिनिधी)–** विद्यमान शिक्षणव्यवस्थेत अमुलाग्र बदल करून ती अधिक विद्यार्थीकेंद्री करण्याचा निर्धार स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कुलगुरू डॉ. मनोहर चासकर यांनी आज येथे व्यक्त केला. स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ आणि पीपल्स कॉलेज, नांदेड यांच्या संयुक्त विद्यमाने 'विद्यार्थ्यांना अपेक्षित शिक्षणव्यवस्था' या विषयावरील एक-दिवसीय परिसंवादाच्या उद्घाटनप्रसंगी ते बोलत होते. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी नांदेड एज्युकेशन सोसायटीचे अध्यक्ष सीए. डॉ. प्रवीण पाटील होते.

उद्घाटनप्रसंगी परिसंवादात सहभागी झालेल्या काही विद्यार्थ्यांनी शिक्षणव्यवस्थेत आपल्याला कोणते बदल हवेत याची सविस्तर मांडणी केली. या मांडणीचा धागा धरून डॉ. चासकर यांनी शिक्षणव्यवस्थेत कोणते बदल केले जात आहेत याचे विवेचन केले. अभ्यासक्रम हे अधिकाधिक उपयोजित केले जात आहेत याचा त्यांनी यावेळी उल्लेख केला. जी महाविद्यालये विद्यार्थ्यांना पायाभूत सुविधा देणार नाहीत त्यांच्यावर कडक कारवाई केली जाईल असा इशारा देखील त्यांनी यावेळी दिला. विद्यार्थ्यांनी सनदशीर मार्गांनी आपल्या मागण्या मांडाव्यात असे आवाहन देखील यावेळी डॉ. चासकर यांनी केले. त्या मागण्या मान्य होतील यासाठी विद्यापीठाकडून सर्वतोपरी प्रयत्न केले जातील असे आश्वासन त्यांनी याप्रसंगी दिले. असे बदल झाल्यास मराठवाडा हा प्रगत आणि पुढारलेला प्रदेश बनेल असा आशावाद त्यांनी व्यक्त केला.

कार्यक्रमास नांदेड एज्युकेशन सोसायटीचे उपाध्यक्ष ॲड. प्रफुल्ल अग्रवाल तसेच विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य नरेंद्र चव्हाण, डॉ. प्रशांत पेशकार, डॉ. सूर्यकांत जोगदंड आणि डॉ. सुरेखा भोसले उपस्थित होते. नरेंद्र चव्हाण यांनी याप्रसंगी बोलताना शिक्षणाचे स्वरूप अधिक व्यावहारिक झाले तरच येणाऱ्या काळातील मोठी आव्हानं पेलण्याची क्षमता विद्यार्थ्यांमध्ये निर्माण होईल असे प्रतिपादन केले.

अध्यक्षीय समारोपात सीए. डॉ. प्रवीण पाटील यांनी शिक्षणव्यवस्थेतून देशाला गरज असलेले सजग विद्यार्थी घडावेत अशी अपेक्षा व्यक्त केली. शिक्षणव्यवस्थेतेने सक्षम माणसं तयार केली पाहिजेत असे त्यांनी यावेळी सांगितले. पीपल्स कॉलेजचे प्राचार्य डॉ. विकास सुकाळे यांनी स्वागतपर मनोगत व्यक्त केले तर परिसंवादाचे संयोजक आणि विद्यापीठाच्या व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. डी. एन. मोरे यांनी परिसंवादाच्या मागची भूमिका विशद केली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. भगवान जाधव यांनी केले तर पीपल्स कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. विशाल पतंगे यांनी आभार मानले.

आदर्श महाविद्यालय, हिंगोली येथील विद्यार्थिनी सपना केंद्रे यांच्या मांडणीने सर्व उपस्थित मान्यवर अतिशय प्रभावीत झाले. डॉ. चासकर यांनी केंद्रे यांचे विशेष कौतुक केले आणि त्यांनी जर पदव्युत्तर शिक्षणासाठी विद्यापीठात प्रवेश घेतला तर त्यांचा सर्व शैक्षणिक खर्च कुलगुरूंच्या अखत्यारीतील विद्यापीठ निधीमधून केला जाईल असे टाळ्यांच्या गजरात जाहीर केले. सोबतच शिवाजी महाविद्यालयाची विद्यार्थिनी कु. अनुसया कुलथे यांनी विद्यार्थ्यांना अपेक्षित शिक्षणव्यवस्था या विषयावर भाष्य केले.

# नांदेड आणि परभणीत १०० वीजचोऱ्या उघडकीस; ३७ वीज चोरांविरुध्द गुन्हे दाखल

**नांदेड (प्रतिनिधी)–** विजेची वितरण व वाणिज्यक हानी कमी करुन ग्राहकांना अखंडित आणि सुरळीत वीज पुरवठा करण्यासाठी महावितरणतर्फे वीज चोरीविरुद्ध कारवाई करण्यात येते. सप्टेंबर महिन्याच्या पूर्वार्धात म्हणजेच १ ते १५ सप्टेंबरपर्यंत नांदेड परिमंडलातील नांदेड आणि परभणी जिल्ह्यात भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १२६ व १३५ अन्वये तपासणी करण्यात आलेल्या वीज ग्राहकांपैकी १०० जणांकडे वीज चोरी होत असल्याचे आढळून आले.

नांदेड परिमंडलात राबविण्यात येत असलेल्या वीज चोरीविरुद्धच्या धडक मोहिमेत नांदेड शहर विभागातील १३, नांदेड ग्रामीण विभागातील १०, सेलू (जि. परभणी) विभागात ७७ ग्राहकांनी वीज मीटरमध्ये हेराफेरी करुन वीज चोरी केल्याचे महावितरणच्या तपासणी पथकाला आढळून आले.

वीजचोरी अहवालानुसार सेलूतील ७७ पैकी ३७ जणांविरुध्द भारतीय विद्युत कायदा २००३ च्या कलम १३५ नुसार पोलिसात गुन्हे दाखल करण्यात आले आहेत. गुन्हे दाखल झालेल्यांमध्ये सेलू येथील प्रयागबाई ढगे, रामचंद्र शर्मा, शाभूदेव बागल, सर्जेराव बर्डे, सुनिल कुलकर्णी, विठ्ठल साबळे, यशोदा पदमावत, यास्मीनबेगम अब्दुल गफार, युसूफ शेख, पांडूरंग निरवाल, महादेव खरतडे, गौतम साळवे, भिमराव धबडगे, बाळासाहेब बेद्रे, आश्रोबा होगे, आनंतराव दुधरगेकर, अंबादास पाईकराव, शिखा अकबर बबनसाब, शेख नूर, शेख हाजी ईस्माईल, शकूतंला खैरे, शकुतंला मुंडलिक, शेख इलियास बेलदार, शेख अकबर, सदाम शेख, साबेर शेख, रेखा कराळे, रकमाजी मुजमुळे, नझरीन चाऊस, नैमखां पाशा खान, खैजमियां शेख, कचरु भदरगे, हौनुखान पठाण, ज्ञानेश्वर सुरवसे, अनिस शेख, अनिता लांगोटे आणि पूर्णा येथील रामेश्वर गटकाळ यांचा समावेश आहे.




**भोकर–** 'समान काम, समान वेतन' च्या मागणीसाठी भोकर येथे न्यायालयीन कर्मचाऱ्यांनी काळी फित लावून कामकाज केले.

## कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांचा नांदेड दौरा

**नांदेड (प्रतिनिधी)–** राज्याचे कृषी मंत्री दत्तात्रय भरणे हे दि. १८ व १९ सप्टेंबर रोजी नांदेड जिल्ह्याच्या दौऱ्यावर येत आहेत.

शुक्रवार, दि. १८ सप्टेंबर रोजी सायंकाळी ४.५५ वाजता पुणे विमानतळ येथून नांदेडकडे प्रयाण करतील. सायंकाळी ६.१५ वाजता नांदेड विमानतळावर आगमन होईल. ६.२० वाजता नांदेड विमानतळावरुन प्रयाण व सायंकाळी ६.४५ वाजता नांदेड शासकीय विश्रामगृह येथे आगमन, राखीव व मुक्काम. शनिवार, दि. १९ सप्टेंबर रोजी सकाळी १० वाजता नांदेड जिल्हाधिकारी कार्यालयातील जिल्हा नियोजन सभागृहामध्ये छत्रपती संभाजीनगर महसूल विभागातील पीक परिस्थितीबाबत पालकमंत्री, लोकप्रतिनिधी, जिल्हाधिकारी तसेच संबंधित सर्व कार्यान्वयीन यंत्रणांच्या प्रमुख अधिकाऱ्यांसमवेत पिक परिस्थितीचा आढावा घेतील. ११.३० वाजता पुयणी ता. नांदेड येथे पीक परिस्थितीची पाहणी करतील.

# शंकर नागरी बँकेच्या आयएमपीएस, यूपीआय सेवेचा शुभारंभ



**नांदेड (प्रतिनिधी)–** शंकर नागरी सहकारी बँक लि. नांदेडच्या विविध लोकोपयोगी सोयी सुविधांमध्ये सातत्याने वाढ होत असून, ग्राहकांना अत्यंत उपयुक्त व अत्यावश्यक असणाऱ्या आय.एम.पी.एस., यू.पी.आय., फोन पे, गुगलपे, मोबाईल बँकिंग सुविधेचा शुभारंभ बँकेचे अध्यक्ष ओमप्रकाश पोकर्णा यांच्या हस्ते करण्यात आला.

सध्याच्या काळाची अत्यंत आवश्यक अशी गरज ओळखून श्री गणेश चतुर्थी व श्री महालक्ष्मी सणानिमित्त शंकर नागरी सहकारी बँकेतर्फे ग्राहक सेवेमध्ये आय.एम.पी.एस., यू.पी.आय., फोन पे, गुगल पे, मोबाईल बँकिंग सेवा समर्पित करण्यात आली. शंकर नागरी सहकारी बँकेने खास ग्राहकांसाठी सदरील सेवा उपलब्ध करुन दिली आहे. या सेवेद्वारे ग्राहकांना इतर सर्व बँकांमधून सुलभतेने आर्थिक व्यवहाराची देवाण-घेवाण करता येईल. ग्राहकांनी सदरील सेवेचा अवश्य लाभ घ्यावा, असे आवाहन बँकेचे सी.ई.ओ., एम. डी. विक्रम राजे यांनी केले आहे.

या प्रसंगी बँकेचे संचालक भास्करराव तरोडेकर, सदाशिवराव देशमुख, मनोजराज भंडारी, बँकेचे सहा. सरव्यवस्थापक नंदकुमार भोळे, बँकेचे आय. टी. व्यवस्थापक सचिन कोरे यांच्यासह कर्मचारीवृंद उपस्थित होते.

## कत्तलीसाठी जाणारी जनावरे पोलिसांनी पकडली, गुन्हा दाखल

**अर्धापूर (प्रतिनिधी)–**गोवंश जातीची दोन जनावरे कत्तलीसाठी नेत असल्याची माहिती गुप्त खबऱ्यामार्फत पोलिसांना माहिती. या माहितीवरून पोलिसांनी आरोपीसह दोन गोवंश जातीची जनावरे पोलिसांनी पकडून ठाण्यात आणून जमा केली. पोलीस उपनिरीक्षक एस. टी. गोणारकर यांच्या फिर्यादीवरून आरोपी अब्दुल अजीम याच्याविरुद्ध विविध कलमाने गुन्हा दाखल करण्यात आला आहे.



पोलीस निरीक्षक महादेव मांजरमकर यांच्या मार्गदर्शनाखाली पुढील तपास जमादार संजय घोरपडे हे करीत असल्याची माहिती ठाणे अंमलदार वाघमारे यांनी दिली आहे.

# 'समान काम समान वेतन'च्या मागणीसाठी मुदखेडच्या न्यायालयीन कर्मचाऱ्यांचे काळ्या फिती लावून आंदोलन

**मुदखेड (प्रतिनिधी)** –मा. उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे दुय्यम न्यायालयांतील कर्मचाऱ्यांनाही वेतनश्रेणी लागू व्हावी, या मुख्य मागणीसाठी राज्य न्यायालयीन कर्मचारी महासंघाच्या आवाहनानुसार मुदखेड न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी बुधवार, दि. १६ सप्टेंबर २०२६ रोजी काळ्या फिती लावून काम करत शासनाच्या दिरंगाईचा तीव्र निषेध नोंदवला.

राज्यातील दुय्यम न्यायालयांमध्ये कार्यरत न्यायालयीन कर्मचाऱ्यांना उच्च न्यायालयातील कर्मचाऱ्यांप्रमाणे वेतनश्रेणी लागू करण्यासाठी उच्च न्यायालयाने गठित केलेल्या न्यायमूर्तींच्या विशेष समितीने आपला अहवाल शासनास सादर केला आहे. मात्र, गेल्या २० महिन्यांपासून शासनाकडून त्यावर कोणताही ठोस निर्णय घेण्यात आलेला नाही. शासनाच्या या उदासीन धोरणामुळे न्यायालयीन कर्मचाऱ्यांमध्ये तीव्र असंतोष पसरला आहे.



याच पार्श्वभूमीवर महासंघाने आंदोलनाची नोटीस शासनाला दिली असून, १६ सप्टेंबरपासून या आंदोलनाच्या पहिल्या टप्प्याला सुरुवात झाली आहे. पहिल्या टप्प्यात कर्मचाऱ्यांनी काळ्या फिती लावून कामकाज केले. शासनाने या मागणीची त्वरित दखल न घेतल्यास आगामी काळात आंदोलन अधिक तीव्र करण्याचा निर्धार मुदखेड न्यायालयातील कर्मचाऱ्यांनी व्यक्त केला आहे.



**नांदेड –** टीचर्स क्लब या सेवाभावी रुग्णालयाच्या आठव्या वर्धापन दिनानिमित्त आयोजित जीवन गौरव पुरस्काराच्या कार्यक्रमाचे गुरूद्वारा लंगर साहिबचे संतबाबा बलविंदरसिंघ महाराज यांच्या हस्ते दीप प्रज्वलित करून उद्घाटन करण्यात आले. यावेळी व्यासपीठावर प्रमुख वक्ते फ. मु. शिंदे, पूर्व शिक्षण संचालक गोविंद नांदेडे, रयत रुग्णालयाचे अध्यक्ष डॉ. सुरेश खुरसाळे, ज्येष्ठ पत्रकार संजीव कुळकर्णी, ज्येष्ठ साहित्यिका डॉ. मथूताई सावंत, डॉ. विजय पवार, जिल्हा मध्यवर्ती बँकेचे मुख्य कार्यकारी अधिकारी डॉ. अजय कदम, स्व. गंगाधरराव पांपटवार वैद्यकीय सहकारी संस्थेचे अध्यक्ष डॉ. गजानन पांपटवार, पंढरीनाथ बोकारे, स्वागताध्यक्ष डी. बी. जांभरूणकर, बालाजी पांपटवार, नामदेव चव्हाणआदी दिसत आहेत. (छाया : करणसिंह बैस)

# गाडीपुरा परिसरातील घरफोडी काही तासांत उघडकीस; आरोपी जेरबंद, मुद्देमाल जप्त



**नांदेड (प्रतिनिधी)–** जिल्ह्यात मालाविरुद्धचे गुन्हे करणाऱ्या आरोपींचा शोध घेण्याचे आदेश पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांनी दिले होते. त्यानुषंगाने इतवारा पोलीस ठाणे हद्दीतील गणेश गल्ली, गाडीपुरा येथे घडलेला घरफोडीचा गुन्हा इतवारा गुन्हे शोध पथकाने अवघ्या काही तासांत उघडकीस आणला आहे.

फिर्यादी विक्रमसिंह नारायणसिंह ठाकूर (वय ४२, रा. गणेश गल्ली, गाडीपुरा) हे दि. १३ सप्टेंबर २०२६ रोजी कामानिमित्त सिडको येथे गेले होते. दुपारी त्यांची पत्नी व मुले घराला कुलूप लावून बाजारात गेली असता अज्ञात चोरट्याने कडी-कोयंडा उघडून कपाट फोडले व सोन्या-चांदीचे दागिने व रोख रक्कम असा एकूण ३ लाख १२ हजार रुपयांचा ऐवज लंपास केला. याप्रकरणी इतवारा पोलीस ठाण्यात गु.र.नं. ३०३/२०२६, कलम ३३१(४), ३०५ BNS अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला होता.

गुन्हा दाखल होताच वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली इतवारा गुन्हे शोध पथकाने घटनास्थळाची पाहणी केली. परिसरातील सीसीटीव्ही फुटेज आणि गोपनीय माहितीच्या आधारे फिर्यादीच्याच गल्लीत राहणारा किराणा दुकानदार दीपकसिंग उर्फ पियुष जीवनसिंग ठाकूर (वय २२, रा. गणेश गल्ली, गाडीपुरा) याच्या हालचाली संशयास्पद आढळल्या. त्याला ताब्यात घेऊन चौकशी केली असता त्याने गुन्ह्याची कबुली दिली. पंचांसमक्ष त्याच्या राहत्या घराच्या दुसऱ्या मजल्यावरील स्टोअर रूममधील पलंगाखाली लपवून ठेवलेला मुद्देमाल जप्त करण्यात आला.

## समाज कल्याण उपायुक्त शिवानंद मिनगीरे संत भोजलिंग काका पुरस्काराने सन्मानित



**नांदेड (प्रतिनिधी)–** विश्वकर्मा सुतार समाजाच्या वतीने समाज कल्याण सहायक उपायुक्त शिवानंद मिनगीरे यांना संत भोजलिंग काका राष्ट्रीय पुरस्काराने सन्मानित करण्यात आले. हा पुरस्कार विश्वकर्मा मंदिर कामठा या ठिकाणी विश्वकर्मा विराट संघाचे राष्ट्रीय अध्यक्ष चंद्रकांत बापू गवळी यांच्या हस्ते प्रदान करण्यात आला.

कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी शिवराम पांचाळ यांची उपस्थिती होती तर प्रमुख पाहुणे म्हणून नागनाथराव देशमुख, बालाजी खर्डे पाटील, गंगाधर पांचाळ वडेपुरीकर, दत्तात्रय टेंभुर्णीकर, आदींची उपस्थिती होती.

शिवानंद मिलगिरे यांची समाजाविषयी असलेली तळमळ लक्षात घेऊन महाराष्ट्रातून पहिला पुरस्कार त्यांना देण्यात आला.

यावेळी संत भोजलिंग काका यांना राष्ट्रीय संत म्हणून घोषित करण्यात यावे असा ठराव घेण्यात आला, ठरावाचे वाचन नागनाथराव देशमुख यांनी केले. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन मारुती उर्फ बाबुराव पांचाळ यांनी केले तर आभार राजीव पांचाळ रेणापूरकर यांनी मानले.

## सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे वसुली लिपिकासह कर्मचाऱ्यांची कमतरता, अनेक कर्मचाऱ्यांकडे अतिरिक्त पदभार



**नवीन नांदेड (प्रतिनिधी)–** नांदेड वाघाळा शहर महानगरपालिका सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे वसुली लिपिकासह कार्यालयीन कर्मचाऱ्यांची कमतरता आहे. या कर्मचाऱ्यांना अतिरिक्त कामाचा पदभार दिल्याने मालमत्ता करासह कार्यालयीन कामकाज खोळंबले असून, मनपा प्रशासनाने तत्काळ कर्मचारी पदे भरून वसुलीसह कार्यालयीन कामकाजाला प्राधान्य द्यावे, अशी मागणी होत आहे.

मनपाअंलर्गत सहा क्षेत्रीय कार्यालये असून, इतर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत प्रभाग क्रमांक १९ व २० साठी सिडको क्षेत्रीय कार्यालय येथे मालमत्ता करधारक जवळपास ३३ हजारांवर आहेत. वसुलीसाठी तीन करनिरीक्षक व वसुली लिपीक केवळ नऊ आहेत. एका लिपिकाकडे दोन दोन प्रभाग देण्यात आले आहेत तर नांदेड शहरातील असलेल्या पाच क्षेत्रीय कार्यालयांमध्ये जवळपास २० ते २५ लिपीक व करनिरीक्षक पाच ते सहा आहेत. तर मनपाच्या मुख्य कार्यालयात अनेक विभागांत मात्र अनेक कर्मचारी कार्यालयीन कामासाठी जास्त आहेत. परंतु मनपाच्या इतर क्षेत्रीय कार्यालयाच्या तुलनेत नवीन मालमत्ता क्रमांक, नाव परिवर्तन, मालमत्ता कर, पाणीपट्टी वसुलीमध्ये अग्रेसर असलेल्या या क्षेत्रीय कार्यालयाकडे प्रशासनाने गेल्या अनेक वर्षांपासून दुर्लक्ष केले आहे.

सध्या असलेल्या कार्यालयीन कर्मचाऱ्यांकडे दोन ते तीन कामाचा पदभार असल्याने आहे त्या कर्मचाऱ्यांकडून मात्र दैनंदिन कामे खोळंबली आहेत. तेव्हा प्रशासनाने पूर्ण वेळ सहायक आयुक्तासह करनिरीक्षक, वसुली लिपीक, कार्यालयीन कर्मचारी रिक्त पदे तत्काळ भरून नागरिकांच्या कामांना प्राधान्य द्यावे, अशी मागणी होत आहे.

## बंजारा समाजाला एसटी आरक्षण मिळण्यासाठी किनवटमध्ये 'बंद'ला प्रतिसाद



**किनवट (प्रतिनिधी)–**बंजारा समाजाचा अनुसूचित जमाती (एसटी) प्रवर्गात समावेश करून आरक्षण द्यावे आणि जिंतूर येथे गेल्या ११ दिवसांपासून आमरण उपोषणास बसलेले विनोद आडे यांच्या आंदोलनाची शासनाने तत्काळ दखल घ्यावी, या मागणीसाठी बुधवारी (दि. १६) सकल बंजारा समाजाच्या वतीने 'किनवट तालुका बंद'ची हाक देण्यात आली होती. या बंदला शहरातील व्यापाऱ्यांनी उत्स्फुर्त प्रतिसाद दिल्याने बंद यशस्वी झाला.

आंदोलनानंतर सकल बंजारा समाजाच्या वतीने किनवटचे उपविभागीय दंडाधिकारी यांना मागण्यांचे निवेदन सादर करण्यात आले. शासनाने या आंदोलनाची आणि उपोषणाची गांभीर्याने दखल घेऊन बंजारा समाजाला एसटी आरक्षण देण्याबाबत तातडीने सकारात्मक निर्णय घ्यावा, तसेच विनोद आडे यांच्या सर्व न्याय्य मागण्या मान्य कराव्यात, अशी मागणी करण्यात आली आहे.

## लोहा तालुक्यात प्रारूप मतदार यादीचे दावे व हरकती दाखल करण्याचे आवाहन

**नांदेड (प्रतिनिधी)–** भारत निवडणूक आयोगाच्या निर्देशानुसार विशेष सखोल पुनरीक्षण कार्यक्रम अंतर्गत ८८-लोहा विधानसभा मतदारसंघातील लोहा तालुक्यातील १९० मतदान केंद्रांवर मतदारांचे गणना फॉर्म भरून घेण्यात आले आहेत. त्यानुसार दि. ३१ ऑगस्ट २०२६ रोजी प्रारूप मतदार यादी प्रसिद्ध करण्यात आली आहे.

लोहा तालुक्यातील मतदारांनी प्रारूप मतदार यादीत आपले नाव आहे किंवा नाही, याची खात्री करून घ्यावी. यासाठी संबंधित मतदान केंद्रस्तरीय अधिकारी यांच्याशी संपर्क साधावा. तसेच निवडणूक आयोगाने दिलेल्या ceo.maharashtra.gov.in d voters.eci.gov.in या संकेतस्थळावरही मतदार यादी तपासता येणार आहे.

प्रारूप मतदार यादीमध्ये नाव नसल्यास तसेच नाव, पत्ता, वय आदी तपशीलांमध्ये काही त्रुटी असल्यास संबंधित मतदारांना दि. ३० सप्टेंबर २०२६ पर्यंत दावे अथवा हरकती दाखल करता येतील. दावे व हरकती तसेच एसआयआर प्रक्रियेतील विविध बाबींची तपासणी करण्यात येणार असून, आवश्यक पुरावे सादर करण्याबाबत संबंधित मतदारांना नोटीस देण्यात येणार आहे. नवीन मतदार नोंदणीसाठी अर्ज सादर करण्याची व त्याची तपासणी करण्याची कार्यवाहीही याच कालावधीत करण्यात येणार आहे.

दि. ३१ ऑगस्ट ते २० ऑक्टोबर २०२६ या कालावधीत प्राप्त दावे-हरकती, अनमॅप मतदार तसेच विसंगती असलेल्या मतदारांच्या सुनावण्या घेण्यात येणार आहेत.

## अटकळी येथे घरफोडी; दीड लाखांची रोकड, एक लाखांचे दागिने लंपास

**शंकरनगर (प्रतिनिधी)–** रामतीर्थ पोलीस ठाण्याच्या हद्दीतील अटकळी येथे अज्ञात चोरट्यांनी घरफोडी करून सुमारे दीड लाख रुपयांची रोख रक्कम आणि जवळपास एक लाख रुपयांचे दागिने लंपास केल्याची घटना समोर आली आहे. या घटनेत सुमारे अडीच ते तीन लाख रुपयांचा मुद्देमाल चोरीस गेल्याचा प्राथमिक अंदाज व्यक्त करण्यात येत असून, गावात खळबळ उडाली आहे.

अटकळी येथील रहिवासी संतोष गंगाधर सूर्यवंशी हे त्यांच्या घरातील व्यक्तीला उपचारासाठी रुग्णालयात घेऊन गेले होते. घरात कोणीही नसल्याची संधी साधून अज्ञात चोरट्यांनी घरात प्रवेश केला. घरातील रोख रक्कम आणि दागिने घेऊन चोरटे पसार झाले. रुग्णालयातून घरी परतल्यानंतर सूर्यवंशी यांच्या निदर्शनास चोरीचा प्रकार आला. त्यांनी तत्काळ रामतीर्थ पोलीस ठाण्यात धाव घेत घटनेची माहिती दिली. घटनेची माहिती मिळताच सहाय्यक पोलीस निरीक्षक विक्रम हराळे यांनी पथकासह घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली. चोरीचा तपास अधिक प्रभावीपणे करण्यासाठी श्वान पथक व फिंगरप्रिंट पथकास पाचारण करण्यात आले. पथकाने घटनास्थळाची पाहणी करून आवश्यक पुरावे संकलित केले असून, चोरट्यांच्या हालचालींचा माग काढण्याचा प्रयत्न सुरू आहे.

# अंतर्मन

# पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वर्षकुंडलीतून राजकीय जीवनात मोठ्या बदलाचे संकेत?

**पंतप्रधान नरेंद्र मोदी यांचा १७ सप्टेंबर रोजी ७६ वा वाढदिवस साजरा झाला. १७ सप्टेंबर १९५० रोजी त्यांचा जन्म झाला. त्यांच्या राजकीय कारकिर्दीचा विचार करता, ते प्रदीर्घ काळ सत्तेच्या केंद्रस्थानी राहिले आहेत. आता त्यांच्या ७६ व्या वर्षासाठी तयार होणाऱ्या वर्षकुंडलीचे ज्योतिषीय विश्लेषण करण्यात आले असून, आगामी वर्ष त्यांच्या राजकीय जीवनात काही महत्त्वाचे बदल घडवून आणणारे ठरू शकते, असा दावा करण्यात आला आहे. नरेंद्र मोदी यांनी ७ ऑक्टोबर २००१ ते मे २०१४ या कालावधीत गुजरातचे मुख्यमंत्री म्हणून काम केले. त्यानंतर ते देशाचे पंतप्रधान झाले. येत्या ७ ऑक्टोबरला त्यांच्या सत्तेतील सलग २५ वर्षांचा कालावधी पूर्ण होणार आहे. त्यांच्या आगामी वर्षाच्या कुंडलीत राजकीय कारकिर्दीशी संबंधित काही महत्त्वाचे संकेत दिसत असल्याचे ज्योतिषीय विश्लेषणात नमूद करण्यात आले आहे.**




## काय असते वर्षकुंडली?

हिंदू ज्योतिषशास्त्रात 'वर्षफल' किंवा 'ताजिक पद्धती'नुसार एखाद्या व्यक्तीच्या जन्मकाळातील सूर्य ज्या अंशावर असतो, त्याच अंशावर गोचरातील सूर्य पुन्हा येतो, त्या वेळेच्या आधारे वर्षकुंडली तयार केली जाते. या कुंडलीच्या आधारे पुढील एका वर्षातील संभाव्य घटना आणि त्यातील शुभ-अशुभ योगांचा अंदाज लावला जातो, अशी ज्योतिषशास्त्रातील पद्धत आहे.

## कुंडलीत मुंथा कोणती भूमिका बजावते?

नरेंद्र मोदी यांच्या जन्मकुंडलीचे लग्न वृश्चिक आहे. त्यामध्ये बहुतांश ग्रह केंद्रस्थानी असल्याने दीर्घकाळ सत्तेत राहण्याचे योग असल्याचा ज्योतिषीय दावा करण्यात आला आहे. १७ सप्टेंबर २०२६ रोजी जन्मकाळातील सूर्याच्या अंशावर गोचरातील सूर्य येत असताना तयार होणाऱ्या वर्षकुंडलीचे लग्न वृषभ आहे. वृषभ ही स्थिर राशी मानली जाते. या वर्षकुंडलीमध्ये 'मुंथा' लाभस्थान असलेल्या अकराव्या भावात दशमेश शनिसोबत आहे. तसेच चतुर्थेश सूर्य आणि पंचमेश बुधाची सप्तम दृष्टी आणि लाभेश गुरूची नवम दृष्टी मुंथेवर पडत असल्याचे सांगण्यात आले आहे. या ग्रहस्थितीला ज्योतिषीय विश्लेषणात 'राजयोगा'चे संकेत मानण्यात आले आहेत.

- » सूर्य-गुरूच्या स्थितीमुळे राजकीय बदलाचे संकेत? : नरेंद्र मोदी यांच्या ७६व्या वर्षासाठी तयार होणाऱ्या वृषभ लग्नाच्या वर्षकुंडलीत सूर्य आणि गुरूची स्थिती महत्त्वाची असल्याचा दावा करण्यात आला आहे. पुढील वर्षी बुधामध्ये शुक्राची योगिनी दशा सुरू असताना जुलैमध्ये होणाऱ्या राष्ट्रपतीपदाच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर नरेंद्र मोदी यांना त्यांच्या पक्षाकडून या घटनात्मक पदासाठी उमेदवार म्हणून पुढे केले जाऊ शकते, असे संकेत कुंडलीत असल्याचे म्हटले आहे. त्यांच्या जन्मकुंडलीनुसार मंगळाची महादशा सुरू असून, २२ ऑक्टोबर २०२६ ते २३ डिसेंबर २०२७ या कालावधीत शुक्राची अंतर्दशा राहणार आहे. जन्मकुंडलीत शुक्र हा पदप्राप्ती आणि परराष्ट्र धोरणाशी संबंधित सप्तम भावाचा तसेच व्ययाशी संबंधित बाराव्या भावाचा स्वामी आहे.
- » परराष्ट्र धोरणाच्या आघाडीवरही आव्हाने? : शुक्राच्या अंतर्दशेदरम्यान परराष्ट्र धोरणाशी संबंधित काही महत्त्वाचे निर्णय आणि त्यावरून राजकीय वाद निर्माण होण्याची शक्यता आहे. अमेरिकेसोबत व्यापार कराराच्या मुद्द्यावर विरोधकांकडून टीका किंवा वाद, चीनसोबत वाढता व्यापारतूट आणि शेजारी बांगलादेशसोबतच्या संबंधांबाबत दबाव निर्माण होण्याची शक्यता आहे. पुढील वर्षाच्या सुरुवातीला सिंह राशीतील मंगळ वक्री होण्याच्या पार्श्वभूमीवर विधानसभा निवडणुकांमध्ये काही राजकीय नुकसान होऊ शकते, असा दावाही करण्यात आला आहे. त्याचबरोबर आरोग्याशी संबंधित अडचणींच्या पार्श्वभूमीवर पक्षाकडून नरेंद्र मोदी यांना राष्ट्रपतीपदाची उमेदवारी स्वीकारण्याची विनंती केली जाऊ शकते.
- » (टीप : वरील राजकीय घडामोडींबाबतचे अंदाज हे ज्योतिषशास्त्रीय विश्लेषणावर आधारित दावे आहेत. त्यांना निश्चित राजकीय भविष्यवाणी किंवा प्रत्यक्ष घडणाऱ्या घटनांचे तथ्य म्हणून पाहता येत नाही.)



# मुख्य प्रवेशद्वारावर आजच ठेवा या 5 गोष्टी; वास्तुशास्त्रानुसार घरात येते सुख-समृद्धी!

**घराच्या मुख्य प्रवेशद्वाराला वास्तुशास्त्रात विशेष महत्त्व आहे. स्वस्तिक, तुळस, आंब्याची किंवा अशोकाची पाने, पाणी-फुलांचे पात्र आणि लक्ष्मीच्या चरणचिन्हांसारख्या काही गोष्टी प्रवेशद्वाराजवळ ठेवणे शुभ मानले जाते. यामुळे घरात सकारात्मक ऊर्जा, शांतता आणि सुख-समृद्धी टिकून राहते, अशी वास्तुशास्त्रातील मान्यता आहे.**



घराचे मुख्य प्रवेशद्वार हे केवळ ये-जा करण्याचे ठिकाण नसून, घरात सकारात्मक ऊर्जा प्रवेश करण्याचा प्रमुख मार्ग मानला जातो. त्यामुळे वास्तुशास्त्रात मुख्य दरवाजाला विशेष महत्त्व दिले जाते. प्रवेशद्वाराजवळ अस्वच्छता किंवा अनावश्यक वस्तू ठेवल्यास त्याचा विपरीत परिणाम होऊ शकतो, अशी मान्यता आहे. त्यामुळे हा परिसर नेहमी स्वच्छ, नीटनेटका आणि शक्यतो मोकळा ठेवण्याचा सल्ला दिला जातो. वास्तुगुरू मान्या यांच्या मते, घरात सुख-समृद्धी, शांतता आणि सकारात्मकता टिकवून ठेवण्यासाठी मुख्य प्रवेशद्वाराजवळ काही शुभ वस्तू ठेवता येतात. जाणून घेऊया त्या कोणत्या...

»

- » मुख्य प्रवेशद्वारावर स्वस्तिक काढा : घराच्या मुख्य दरवाजाच्या वरच्या बाजूस किंवा दोन्ही बाजूंना, डोळ्यांच्या पातळीवर स्वस्तिकाचे चिन्ह काढता येते. वास्तुशास्त्रानुसार स्वस्तिक हे शुभत्व, सौहार्द, सकारात्मकता आणि दैवी कृपेचे प्रतीक मानले जाते. मुख्य प्रवेशद्वारावर स्वस्तिक असल्याने नकारात्मक ऊर्जा घरात प्रवेश करण्यापासून रोखली जाते, अशी मान्यता आहे. त्यामुळे घरातील वातावरण प्रसन्न राहण्यास मदत होते, तसेच धन- समृद्धीचे प्रतीक असलेल्या लक्ष्मीच्या आगमनासाठीही हे चिन्ह शुभ मानले जाते.
- » आंब्याच्या किंवा अशोकाच्या पानांचे तोरण लावा : वास्तुशास्त्रानुसार मुख्य प्रवेशद्वारावर आंब्याच्या किंवा अशोकाच्या पानांचे तोरण लावणे शुभ मानले जाते. आंब्याची पाने, अशोकाची पाने किंवा झेंडूच्या फुलांपासून तयार केलेले तोरण दरवाजाच्या वरच्या चौकटीला लावता येते. अशा तोरणामुळे घरातील वातावरण शुद्ध आणि सकारात्मक राहते, अशी मान्यता आहे. मात्र, तोरणासाठी शक्यतो ताजी पाने आणि ताजी फुले वापरावीत. पाने किंवा फुले सुकल्यानंतर ती त्वरित काढून नवीन तोरण लावावे.
- » पाणी आणि फुलांनी भरलेले पात्र ठेवा :मुख्य प्रवेशद्वारासमोर किंवा जवळ पितळ अथवा मातीच्या सुंदर पात्रात पाणी भरून ठेवण्याची पद्धतही वास्तुशास्त्रात शुभ मानली जाते. या पात्रात गुलाब किंवा झेंडूची फुले टाकता येतात. मान्यतेनुसार, प्रवेशद्वाराजवळ असे पात्र ठेवल्याने घरातील वातावरण शांत, प्रसन्न आणि सकारात्मक राहते. नकारात्मक ऊर्जा दूर राहण्यासही याची मदत होते, असे वास्तुशास्त्रात सांगितले जाते. मात्र, पात्रातील पाणी नियमितपणे बदलणे आवश्यक आहे. साधारणपणे एक-दोन दिवसांनी पाणी बदलावे.
- » लक्ष्मीच्या चरणचिन्हांची स्थापना करा : मुख्य प्रवेशद्वाराच्या उंबरठ्याजवळ लक्ष्मीच्या चरणचिन्हांची स्थापना करताना ती घराच्या आतील दिशेने येत असल्याप्रमाणे असावीत, अशी वास्तुशास्त्रातील मान्यता आहे. चरणचिन्हे घराच्या बाहेर जात असल्यासारखी दिसणार नाहीत, याची काळजी घ्यावी. लक्ष्मीची चरणचिन्हे घरात येत असल्याचे प्रतीक मानले जाते. त्यामुळे घरात धन, समृद्धी आणि सुख-शांतीचे आगमन होते, अशी धार्मिक व वास्तुशास्त्रीय धारणा आहे.

## तुळस किंवा शुभ वनस्पती लावा

वास्तुशास्त्रानुसार मुख्य प्रवेशद्वाराजवळ काही विशिष्ट वनस्पती ठेवणे शुभ मानले जाते. दरवाजाच्या उजव्या बाजूस तुळशीचे रोप ठेवता येते. मात्र, तुळशीचे रोप निरोगी आणि हिरवेगार असावे. मुख्य प्रवेशद्वाराजवळ काटेरी वनस्पती ठेवणे टाळावे, असे वास्तुशास्त्रात सांगितले जाते. तुळस ही पवित्रता, सकारात्मकता आणि समृद्धीचे प्रतीक मानली जाते. वास्तुदोषांचा प्रभाव कमी करण्यासाठीही तुळशीचे महत्त्व सांगितले जाते. मुख्य प्रवेशद्वार स्वच्छ, सुंदर आणि नीटनेटके ठेवण्यासोबतच या शुभ वस्तूंचा वापर केल्यास घराचे वातावरण प्रसन्न आणि सकारात्मक राहण्यास मदत होऊ शकते, अशी वास्तुशास्त्रीय मान्यता आहे.

# सुख-सुविधांनी भरलेले जीवन, तरीही मन अशांत का?

**ज्याला जग सुख मानते, त्याच्याही पलीकडे जाण्याचा मार्ग ज्ञानी माणूस शोधत असतो. धन शरीराला सुख-सुविधा देऊ शकते, प्रेम आणि आकर्षण मनाला मोहवू शकते, तर यश-कीर्ती समाजात प्रतिष्ठा मिळवून देऊ शकते; मात्र यापैकी कोणतीही गोष्ट मृत्यू, मोह, भीती आणि अंतहीन असमाधानापासून कायमची मुक्ती देऊ शकत नाही, असा या विचारांचा गाभा आहे.**

- » धन-संपत्तीने सुख मिळते, पण मनःशांती? : धन आणि भौतिक साधनसंपत्ती माणसाला सुख-सुविधा देऊ शकतात; मात्र त्यातून मनाला कायमस्वरूपी शांती मिळेलच असे नाही. खरे सुख बाह्य वस्तूंमध्ये नसून मनातील समाधान आणि आत्मबोधात दडलेले आहे. 'कंचन' म्हणजे धन-वैभव, 'कामिनी' म्हणजे सांसारिक प्रेम व आकर्षण आणि 'कीर्ती' म्हणजे यश-प्रतिष्ठा. या गोष्टी माणसाला सुखी असल्याचा अनुभव देऊ शकतात; परंतु त्यातून अंतर्मनाला कायमस्वरूपी समाधान मिळेलच असे नाही.
- » सुख-दुःखात समतोल साधणे गरजेचे : सुख मिळवण्याचा आणखी एक मार्ग म्हणजे सुख आणि दुःख या दोन्ही अवस्थांकडे समतोल वृत्तीने पाहण्याची सवय लावणे. मानसिक शांतता असेल, तरच सुखाचा खरा अनुभव घेता येतो. हे जगच द्वंद्वात्मक आहे. सुख-दुःख, निंदा-स्तुती, जय-पराजय, लाभ-हानी, जन्म-मृत्यू, संयोग-वियोग अशा परस्परविरोधी अनुभवांनी मानवी जीवन व्यापलेले आहे. म्हणूनच जीवनात केवळ सुखाचा शोध घेण्यापेक्षा सुख-दुःख या दोन्हींचा स्वीकार करून मनाचा समतोल राखणे अधिक महत्त्वाचे ठरते.

# पती-पत्नीच्या नात्यातील तणाव कमी करण्यासाठी बेडरूममध्ये करा 'हे' बदल




**पती- पत्नीच्या नात्यातील छोट्या-मोठ्या कुरबुरी हा वैवाहिक जीवनाचा भाग असू शकतो. मात्र, क्षुल्लक कारणांवरून वारंवार वाद होत असतील आणि नात्यातील तणाव वाढत असेल, तर बेडरूममधील वातावरणाकडेही लक्ष देण्याचा सल्ला वास्तुशास्त्रात दिला जातो. वास्तुगुरू मान्या यांच्या मते, बेडरूममध्ये काही वस्तू चुकीच्या ठिकाणी किंवा चुकीच्या दिशेला असल्यास वातावरणावर परिणाम होऊ शकतो, अशी वास्तुशास्त्रीय मान्यता आहे. त्यामुळे काही छोटे बदल केल्यास खोलीतील वातावरण अधिक सकारात्मक आणि प्रसन्न ठेवण्यास मदत होऊ शकते.**

## बेडरूमशी संबंधित या गोष्टी लक्षात ठेवा

- » बेडरूमची दिशा योग्य असावी : वास्तुशास्त्रानुसार पती-पत्नीची बेडरूम घराच्या नैऋत्य दिशेला असणे शुभ मानले जाते. यामुळे पती-पत्नीमधील नाते दृढ होण्यास आणि भावनिक जवळीक वाढण्यास मदत होते, अशी मान्यता आहे.
- » झोपण्याची दिशा महत्त्वाची : झोपताना डोके दक्षिण किंवा पश्चिम दिशेला असावे, असे वास्तुशास्त्रात सांगितले जाते. मात्र, उत्तर दिशेला डोके करून झोपणे योग्य मानले जात नाही.
- » पत्नीने कोणत्या बाजूला झोपावे? : वास्तुशास्त्रीय मान्यतेनुसार, पत्नीने पतीच्या डाव्या बाजूला झोपावे. यामुळे पती-पत्नीमधील भावनिक संतुलन आणि परस्पर सुसंवाद वाढतो, अशी धारणा आहे.
- » गादी, तुळई आणि आरशाबाबत करा हे बदल : वास्तुगुरू मान्या यांच्या मते, डबल बेडवर दोन स्वतंत्र गाद्या वापरण्याऐवजी एकच सलग गादी वापरणे योग्य मानले जाते. दोन वेगवेगळ्या गाद्यांमुळे नात्यात दुरावा निर्माण होतो, अशी वास्तुशास्त्रीय मान्यता आहे. बेडच्या अगदी वर छताची जड तुळई नसावी. अशा तुळईमुळे पती-पत्नीमध्ये तणाव आणि मानसिक अस्वस्थता निर्माण होऊ शकते, असे वास्तुशास्त्रात मानले जाते. तसेच, बेडच्या अगदी समोर आरसा ठेवणे टाळावे. आरसा त्या ठिकाणाहून हलवणे शक्य नसल्यास रात्री झोपताना तो कापडाने झाकून ठेवण्याचा सल्ला दिला जातो.
- » बेडरूमच्या रंगसंगतीकडेही लक्ष द्या : बेडरूममध्ये गडद लाल, काळा किंवा गडद निळा रंग वापरणे टाळावे, असे वास्तुशास्त्रात सांगितले जाते. त्याऐवजी फिकट गुलाबी, पीच, पांढरा किंवा पेस्टल हिरवा यांसारख्या सौम्य रंगांचा वापर करता येतो. हे रंग खोलीला प्रसन्न वातावरण देतात आणि मन शांत ठेवण्यास मदत करतात, अशी मान्यता आहे. बेडच्या स्टोरेजमध्ये भंगार, जुन्या लोखंडी वस्तू, अनावश्यक साधने किंवा युद्ध, दुःख अथवा उदासी दर्शविणारी चित्रे ठेवू नयेत. त्याऐवजी बेडरूमच्या नैऋत्य भिंतीवर पती-पत्नीचे हसतमुख छायाचित्र लावण्याचा सल्ला दिला जातो.
- » बेडरूममध्ये इलेक्ट्रॉनिक वस्तू कमी ठेवा : वास्तुशास्त्रानुसार बेडरूममध्ये टीव्ही, संगणक किंवा लॅपटॉप ठेवणे टाळावे. या उपकरणांमुळे मानसिक तणाव वाढू शकतो आणि त्याचा परिणाम पती-पत्नीच्या संवादावर होऊ शकतो, अशी वास्तुशास्त्रीय मान्यता आहे. बेडरूममध्ये टीव्ही ठेवायचा असल्यास रात्री झोपताना तो कापडाने झाकून ठेवण्याचा सल्ला दिला जातो. शक्य असल्यास बेडरूममध्ये कार्यालयीन काम करणेही टाळावे. कामासाठी स्वतंत्र जागा ठेवणे अधिक योग्य मानले जाते.
- » जलतत्त्वाशी संबंधित वस्तू टाळा : बेडरूममध्ये कारंजे, मत्स्यालय किंवा पाण्याशी संबंधित सजावटीच्या वस्तू ठेवू नयेत, असे वास्तुशास्त्रात सांगितले जाते. अशा वस्तूंमुळे भावनिक अस्थिरता आणि नात्यातील विश्वास कमी होऊ शकतो, अशी मान्यता आहे. त्यामुळे बेडरूममध्ये अशा वस्तू असल्यास त्यांचे स्थान बदलण्याचा सल्ला दिला जातो.

# राधाष्टमीला राधाराणीला अर्पण करा हे 5 नैवेद्य; जाणून घ्या आवडते भोग...

**राधाष्टमीचे व्रत यंदा १९ सप्टेंबरला पाळले जाणार आहे. भाद्रपद महिन्यातील शुक्ल पक्षातील अष्टमी तिथीला राधाष्टमी साजरी केली जाते. या दिवशी राधाराणीची विधिवत पूजा करून त्यांना आवडणारे नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा आहे. श्रद्धेनुसार, राधाराणीला प्रिय असलेले भोग अर्पण केल्याने त्या प्रसन्न होतात आणि भक्तांवर त्यांची कृपादृष्टी राहते. राधाष्टमीचे व्रत करणाऱ्या व्यक्तीच्या मनोकामना पूर्ण होतात, अशी धार्मिक मान्यता आहे. या दिवशी राधाराणीची भक्तिभावाने पूजा करण्यासोबतच त्यांना विविध नैवेद्य अर्पण केले जातात. असेही मानले जाते की, ज्याच्यावर राधाराणीची कृपा असते, त्याच्यावर भगवान श्रीकृष्णाची कृपाही सहज होते. राधाराणीच्या भक्तीमुळे भगवान श्रीकृष्णाचे अपार प्रेम प्राप्त होते, अशी श्रद्धा आहे.**



- » राधाराणीचे प्रिय नैवेद्य कोणते? : मालपुआ आणि रबडी : राधाष्टमीच्या दिवशी राधाराणीला मालपुआ आणि रबडीचा नैवेद्य अर्पण करण्याची परंपरा आहे. हे दोन्ही पदार्थ राधाराणीला प्रिय असल्याची धार्मिक मान्यता आहे. त्यामुळे या दिवशी भक्तिभावाने मालपुआ आणि रबडीचा भोग दाखवला जातो.
- » पंचामृत आणि धनिया पंजीरी : राधाष्टमीच्या पूजेत पंचामृताचा नैवेद्य अर्पण करणे शुभ मानले जाते. दूध, दही, तूप, मध आणि गंगाजल यांचे मिश्रण करून पंचामृत तयार केले जाते. तसेच, भगवान श्रीकृष्णाप्रमाणेच राधाराणीलाही धनिया पंजीरी प्रिय असल्याची मान्यता आहे. त्यामुळे राधाराणीबरोबरच भगवान श्रीकृष्णालाही धनिया पंजीरीचा नैवेद्य अर्पण केला जातो.
- » अळूची भाजी : राधाष्टमीच्या दिवशी राधाराणीला अळूचा नैवेद्य अर्पण करणेही प्रिय मानले जाते. त्यामुळे या दिवशी अळूपासून तयार केलेला सात्त्विक पदार्थ प्रसाद म्हणून अर्पण करता येतो. मात्र, नैवेद्यासाठी तयार करण्यात येणाऱ्या भाजीमध्ये कांदा आणि लसूण वापरू नये, अशी धार्मिक परंपरा आहे.
- » लोणी-साखर : भगवान श्रीकृष्णाला लोणी-साखरेचा नैवेद्य विशेष प्रिय असल्याची श्रद्धा आहे. त्याचप्रमाणे राधाष्टमीच्या दिवशी राधाराणीलाही लोणी-साखरेचा भोग अर्पण केला जातो. भक्तिभावाने हा नैवेद्य अर्पण करून त्यानंतर प्रसाद म्हणून ग्रहण करण्याची प्रथा आहे.
- » खीर : राधाष्टमीच्या दिवशी राधाराणीसाठी खिरीचा नैवेद्य तयार करण्याचीही परंपरा आहे. यासाठी तांदळाची खीर किंवा मखान्याची खीर बनवता येते. दूध आणि साखरेपासून तयार केलेली खीर राधाराणीला अर्पण करून पूजा पूर्ण केल्यानंतर ती प्रसाद म्हणून वाटता येते. राधाष्टमीच्या दिवशी श्रद्धा, भक्ती आणि सात्त्विकतेने राधाराणीची पूजा करून नैवेद्य अर्पण केला जातो. विविध ठिकाणी स्थानिक परंपरेनुसार नैवेद्य आणि पूजाविधीत काही फरक असू शकतो.

# औसा तालुक्यातील खरीप पिकांच्या नुकसानीची पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी केली पाहणी

**औसा (प्रतिनिधी)**–लातूर जिल्ह्यात पावसाने ओढ दिल्याने खरीप हंगामातील पिकांना मोठा फटका बसला असून, या पार्श्वभूमीवर जिल्ह्याचे पालकमंत्री तथा सार्वजनिक बांधकाम मंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी गुरुवारी औसा तालुक्यातील बोरफळ व आशिव शिवारातील नुकसानग्रस्त पिकांची प्रत्यक्ष पाहणी केली. यावेळी त्यांनी शेतकऱ्यांशी संवाद साधून त्यांच्या अडचणी आणि पिकांच्या नुकसानीची माहिती जाणून घेतली.

बोरफळ येथील शेतकरी व्यंकट यादव यांच्या शेतात तसेच आशिव येथील शेतकरी अजय जगताप यांच्या शेतात जाऊन पालकमंत्री भोसले यांनी सोयाबीनसह अन्य खरीप पिकांची पाहणी केली. गेल्या दोन महिन्यांपासून पावसाने दडी मारल्यामुळे पिकांना आवश्यक पाणी मिळाले नसून, अनेक भागांतील सोयाबीन व इतर पिके वाळून गेली आहेत. त्यामुळे शेतकऱ्यांच्या हातातील खरीप हंगाम मोठ्या प्रमाणात संकटात सापडला आहे. निसर्गाच्या प्रतिकूल परिस्थिती-मुळे शेतकरी अडचणीत आला असताना शासन त्यांच्या पाठीशी खंबीरपणे उभे आहे. कोणत्याही परिस्थितीत शेतकऱ्यांना वाऱ्यावर सोडले जाणार नाही, अशी ग्वाही पालकमंत्री शिवेंद्रसिंहराजे भोसले यांनी यावेळी दिली.

**तहसील कार्यालय नायगाव (खै.) जि. नांदेड**

**जाहीर प्रगटन**

मौजे कहाळा खु. ता. नायगांव खै. येथील सर्व जनतेस या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, शेषाबाई गणपती मेघळ रा. कहाळा खु. ता. नायगांव खै. यांनी तहसील कार्यालय नायगांव खै. येथे अर्ज सादर करून मौ. कहाळा खु. ता. नायगांव खै. येथील गट क्रमांक २२० मधील ७/१२ चे इतर अधिकारामध्ये संरक्षित कुळ मारोती दोन वर्षापासून काबीज नाही (१०००३) अशी नोंद आहे. त्यामुळे ७/१२ उताऱ्यावरील इतर अधिकारात आलेले कुळाचे नांव कमी करुन ७/१२ उतारा देण्यात यावा अशी विनंती केली आहे.

तरी याबाबत कुणाचे आक्षेप असल्यास १५ दिवसांचे आत मा. तहसीलदार नायगांव खै. यांच्याकडे सक्षम पुराव्यासह आपला आक्षेप नोंदवावा. अन्यथा विहित मुदतीनंतर शासन नियमानुसार इतर अधिकारातील साधा कुळाची नोंद कमी करण्याची कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.

**तहसीलदार**
**नायगांव खै.**

## Change In Name

My Old Name Is **SHRIN BEGUM KHALEELAHAMAD** Now I Am Changing As New Name **SHIREEN BEGUM KHALEEL AHEMAD** Heance Forth My All Correspondence Will Be Done As Per My New Name. Please Kindly Consider The Same. **Address-** H No 2-5-136 Khadakpura Near J.k Electricals, Nanded Maharashtra-431601

## Change In Name

My Old Name Is **NASEEM FIRDOSE** Now I Am Changing As New Name **NASEEM FIRDOSE ABDUL WASAY SANI** Heance Forth My All Correspondence Will Be Done As Per My New Name. Please Kindly Consider The Same. **Address-** H. No. 9-6-1075/1 Rahmat Nagar, Gadegao Road, Near Moti Masjid, Nanded-431604 Maharashtra, Mobile No. 9975501766

## Change In Name

My Old Name Is **MUSTAFA SK MAHEBOOB** Now I Am Changing As New Name **SHAIKH MUSTAFA SHAIKH MAHEBOOB** Heance Forth My All Correspondence Will Be Done As Per My New Name. Please Kindly Consider The Same.

**Address-** Lane Talab ,Basmath, Hingoli Maharashtra 431512

## Change In Name

My Old Name Is **NASEEM BEGUM** Now I Am Changing As New Name **NASEEM FIRDOSE ABDUL WASAY SANI** Heance Forth My All Correspondence Will Be Done As Per My New Name. Please Kindly Consider The Same. **Address-** H. No.9-6-1075/1 Rahmat Nagar, Gadegao Road, Near Moti Masjid, Nanded-431604 Maharashtra, Mobile No. 9975501766

## Change In Name

My Old Name Is **SANTOSH MURLIDHARRAO LAPSHETWAR** Now I Am Changing As New Name **SANTOSH MURLIDHAR LAPSHETWAR** Heance Forth My All Correspondence Will Be Done As Per My New Name. Please Kindly Consider The Same. **Address-** House no 149 Shanti niwas nanded housing society vijay nagar nanded Pin 431602

## Change In Name

My Old Name Is **ABDUL SATTAR SK AHAMAD** Now I Am Changing As New Name **ABDUL SATTAR SHAIKH AHMED** Heance Forth My All Correspondence Will Be Done As Per My New Name. Please Kindly Consider The Same. **Address-** H. No 2-5-136 Khadakpura Near J. k. Electricals, Nanded Maharashtra-431601

## धनादेश व मुद्रांक हरवले आहे

माझे विक्रम सुरेशचंद्र अग्रवाल या नावाचे एस.बी.आय. बँक गुरूद्वारा शाखा नांदेड या शाखेचे धनादेश क्रमांक ५४३५२३, ५४३३२४,५४३३२५ स्वाक्षरी केलेले तीन चेक कोरे असलेले व शंभर रुपये मुद्रांक नंबर ५८ B २२७२ मुद्रांक कोरा व स्वाक्षरी असलेले कागदपत्रे ४ मे २०२६ ते २४ जून २०२६ दरम्यान बॅगमधून दुचाकीवरून येत असताना गहाळ झाले आहेत. वरील कोरे धनादेश व मुद्रांक यांच्या सापडल्यास कोणीही व्यवहार करू नये. कोणास सापडल्यास अथवा मिळाल्यास संपर्क साधावा..

**विक्रम सुरेशचंद्र अग्रवाल,**
**न्याय नगर नविन कौठा नांदेड**
**संपर्क मोबाईल नंबर ९८९०५९९१६९**

**जाहीर प्रगटन**

सर्व जनतेस व संबंधितांना या जाहीर प्रगटनाद्वारे कळविण्यात येते की, मी सही करणाऱ्यांनी नांदेड येथील बेबीसरोजा गोबिंदबुवा बरभत रा. चैतन्यनगर, तरोडा बु. ता. जि. नांदेड यांच्या मालकी व ताब्यातील मौ. हदगाव, ता. हदगाव, जि. नांदेड. हदगाव नगरपालिका हद्दीतील गट क्र. १८४/१ ज्याचा घर नं. ७७ आहे. ज्याची एकूण लांबी दक्षिण-उत्तर ५० फुट म्हणजेच १५.२५ मीटर व रुंदी पूर्व-पश्चिम ३३ फुट म्हणजेच १०.०६ मीटर आहे. ज्याच्यावर कच्चे स्वरूपाचे बांधकाम आहे व टीनपत्राचे छत आहे. ज्याचे एकूण क्षेत्रफळ १६५० फुट म्हणजेच १५३.३८ चौ. मीटर आहे.

येणे प्रमाणे चतुःसीमा खालीलप्रमाणे आहे.

पूर्वेस-२० फुट रुंद रोड आहे, पश्चिम-तावडे साहेब यांचे घर

दक्षिणेस-२० फुट रुंद रोड आहे, उत्तरेस-मनूलकर यांचे घर आहे.

वरीलप्रमाणे चतुःसीमेच्या आतील वर्णनाचा प्लॉट/घर नं. ७७ बेबीसरोजा गोविंबुवा बरभत यांच्याकडून विकत घेण्याचा करार केला असून, बयानापोटी काही रक्कमही दिली आहे. तरी वरील प्लॉट/घर नं. ७७ बाबत कोणास काही आक्षेप, उजर, मालकी हक्क, देवाण-घेवाण, कुळ कर्ज असल्यास हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ७ दिवसांच्या आत आमच्याकडे लेखी कागदपत्रांसह आपला आक्षेप दाखल करावा. मुदत संपल्यावर कोणाचाही काही उजर नाही असे ग्राह्य धरून या प्लॉट/घर नं. ७७ ची नोंदणीकृत खरेदीखत/रजिस्ट्री करून घेण्यात येईल. मुदतीनंतर आलेला आक्षेप स्वीकारल्या जाणार नाही. म्हणून हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध करीत आहोत.

| जाहीर प्रगटन देणार | मार्फत |
|---|---|
| मंजुश्री विलास तिवडे | अ‍ॅड. बी. एस. तिवडे |
| रा. संभाजीनगर, हदगाव | रा. गोपाळनगर, सांगवी बु. नांदेड |
| मो. ९४२३४३६६३० | मो. ९८९०९१५३२५ |

**जाहीर प्रगटन**

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्रारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi -११००३३, यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिति व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १३९/३ मधील क्षेत्र ०.२४ हे. ही जमीन सुनिता दत्ता गोटमुखले यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत.

सबब हेजाहीर प्रगटन.

| तर्फे | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| अ‍ॅड. बी. डी. कुलकर्णी | BHARAT SMARTEK PRIVTE LIMITED |
| मंजुळा नगर, भोकर, | डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली. |
| ता. भोकर, जि.नांदेड | |
| मो.नं- ८८५६८०१२२९ | |

# तिरुपती सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादित धनेगाव, नांदेड, ता. जि. नांदेड

(Reg No. NND/H.S.G./1009/ of 80 Date 29-11-1980)

जा. क्र. --- दिनांक-१७/९/२०२६

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (फक्त सभासदांकरिता)

तिरुपती सहकारी गृहनिर्माण संस्था म. धनेगाव, ता. जि. नांदेडच्या सर्व सन्मानीय सभासदांना कळविण्यात येते की, आपल्या संस्थेची सन २०२६-२०२७ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.३०.०९.२०२६, रोज बुधवार, सकाळी ठिक ११.४५ वा. संस्थेचे कार्यालय अंबिका मंगल कार्यालयाजवळ नरहर नगर नांदेड येथे संस्थेचे चेअरमन श्री मायकल सूर्यभान जगदाळे यांच्या अध्यक्षतेखाली घेण्याचे ठरले आहे. तरी आपण सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहून सहकार्य करावे ही विनंती.

**सभेची विषय सूची-**

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करून कायम करणे. २. दि. १/४/२०२५ ते ३१/३/२०२६ पर्यंतचा जमा-खर्च नफा-तोटा व ३१/३/२०२६ चे ताळेबंदपत्र स्वीकारून त्यास मान्यता देणे. ३. सन-२०२५-२०२६ चे लेखापरीक्षणाचे दोष-दुरुस्ती अहवालास मान्यता देणे बाबत. ४. आर्थिक वर्ष सन-२०२६-२०२७ च्या कालावधीचे लेखापरिक्षण करण्यासाठी लेखापरीक्षकाची नेमणूक करणे बाबत. ५. सन २०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे बाबत.मा. सभाध्यक्षांच्या परवानगीने आयत्या वेळी येणाऱ्या विषयांवर चर्चा करून निर्णय घेणे.

**नोट-** कोरम अभावी सभा तहकूब झाल्यास त्याच ठिकाणी एका तासाने सभा घेण्यात येईल. त्यासाठी कोरमची आवश्यकता राहणार नाही.

**चेअरमन**
**तिरुपती सह. गृहनिर्माण संस्था मर्यादित धनेगाव**
**ता. जि. नांदेड**

# विश्वकर्मा मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था म. वसरणी, ता. जि. नांदेड

(नोंदणी क्र. एनएनडी/एनएनडी/एचएसजी/टीओ/६४०/२०२१ दि. २८/५/२०२१)

जा. क्र. २०२६ दिनांक-१७/९/२०२६

## वार्षिक सर्वसाधारण सभेची सूचना (फक्त सभासदांकरिता)

विश्वकर्मा मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था म. वसरणी, ता. जि. नांदेडच्या सर्व सन्मानिय सभासदांना कळविण्यांत येते की, आपल्या संस्थेची सन २०२५-२०२६ या वर्षाची वार्षिक सर्वसाधारण सभा दि.३०.०९.२०२६, बुधवार, दुपारी ठिक १.०० वा. संस्थेचे अध्यक्ष श्री नागनाथ विश्वनाथराव पांचाळ यांच्या अध्यक्षतेखाली खालील दर्शविलेल्या ठिकाणी विषयसूचितील विषयावर विचारविनिमय करुन निर्णय/ठराव मंजूर करण्यासाठी आयोजित केलेली आहे. तरी आपण सर्व सभासदांनी सभेस वेळेवर उपस्थित राहावे ही विनंती.

**सभेची विषय सूची-**

१. मागील वार्षिक सर्वसाधारण सभाच्या अहवालाचे वाचन करुन कायम करणे. २. संस्थेच्या सन-२०२५ २०२६ च्या तेरीजपत्रक, नफा-तोटा पत्रक व ताळेबंदास मंजुरी देणे. ३. संस्थेच्या सन-२०२६-२०२७ च्या अंदाजपत्रकास मंजुरी देणे. ४.संस्थेच्या सन-२०२५-२०२६ च्या लेखापरिक्षण अहवालास व दोष दुरुस्ती अहवालास मंजुरी देणे. ५. संस्थेचे सन-२०२६-२०२७या कालावधीच्या लेखापरिक्षणासाठी लेखापरिक्षकाची नेमणुक करणे बाबत. ६. संस्थेच्या विरोधात मा. न्यायालय, औरंगाबाद येथील चालू असलेल्या केसेस संबंधाने चर्चा. ७. संस्थेच्या विरोधात मा. न्यायालय, नांदेड येथील चालू असलेल्या केसेस संबंधाने चर्चा.. ८. संस्थेवर झालेल्या अतिक्रमाणाबाबत मा. पोलिस स्टेशन व म.न.पा.बाबतीत चर्चा. ९. सभासद भाग (हिस्सा) हस्तांतर करणे बाबत चर्चा. १०. आयत्या वेळचे विषय मा. अध्यक्ष यांच्या परवानगीने.

**सभेचे ठिकाण- श्री रमाकांत पांचाळ यांचे निवासस्थान, ओमनगर, वाजेगांव, ता. जि. नांदेड.**

**सभा दिनांक- ३०.०९.२०२६, बुधवार, वेळ- दूपारी ठिक १.०० वा.**

**कार्यकारी मंडळाच्या आदेशाने,**
**(एन. डी. पोलादवार)**
**सचिव,**
**विश्वकर्मा मागासवर्गीय सहकारी गृहनिर्माण संस्था म. वसरणी, ता. जि. नांदेड.**

**नोट-**१. पोटनियमातील क्रं. १०१ अन्वये सभेची गणपूर्ती न झाल्यास सदरील सभा तहकुब करुन एक तासानंतर त्याच ठिकाणी त्याच दिवशी सभेचे कामकाज सुरु होईल. तेव्हा त्यास गणपूर्तीची आवश्यकता राहणार नाही. २.संस्थेच्याकामकाजाविषयीकाहीप्रश्नविचारावयाचेअसल्याससभेच्यातारखेपूर्वीसातदिवसअगोदरतेलेखीसादरकरावेत. मुदतीनंतर आलेले प्रश्न विचारात घेतले जाणार नाहीत. कृपया नोंद घ्यावी.. ३. सभेची नोटीस सभासदांना पोस्टद्वारे, प्रतिनिधीद्वारे पाठविण्यात आलेली आहे. दैनिक गोदातीर समाचार वृत्त पत्रिकेत प्रसिध्दी करण्यात आलेली आहे. संस्थेच्या नावाने असलेल्या सभासद व्हाट्सअप ग्रुपवर टाकण्यात आलेली आहे. ४. सभासदांनी सभेस स्वतः येणे बंधनकारक आहे. इतर व्यक्तींना परवानगी देण्यात येणार नाही.

**जाहीर प्रगटन**

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्रारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi -११००३३, यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिति व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १३९/३ मधील क्षेत्र ०.२४ हे. ही जमीन दिगंबर लक्ष्मण गोटमुखले यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत.

सबब हेजाहीर प्रगटन.

| तर्फे | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| अ‍ॅड. बी. डी. कुलकर्णी | BHARAT SMARTEK PRIVTE LIMITED |
| मंजुळा नगर, भोकर, | डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली. |
| ता. भोकर, जि.नांदेड | |
| मो.नं- ८८५६८०१२२९ | |

**जाहीर प्रगटन**

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्रारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi -११००३३, यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिति व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १३९/५ मधील क्षेत्र ०.६७ हे. ही जमीन दत्तात्रय नागनाथ कापावार यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत.

सबब हेजाहीर प्रगटन.

| तर्फे | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| अ‍ॅड. बी. डी. कुलकर्णी | BHARAT SMARTEK PRIVTE LIMITED |
| मंजुळा नगर, भोकर, | डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली. |
| ता. भोकर, जि.नांदेड | |
| मो.नं- ८८५६८०१२२९ | |

**जाहीर प्रगटन**

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्रारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi -११००३३, यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिति व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १३९/४ मधील क्षेत्र ०.७८ हे. ही जमीन दिगंबर लक्ष्मण गोटमुखले यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत.

सबब हेजाहीर प्रगटन.

| तर्फे | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| अ‍ॅड. बी. डी. कुलकर्णी | BHARAT SMARTEK PRIVTE LIMITED |
| मंजुळा नगर, भोकर, | डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली. |
| ता. भोकर, जि.नांदेड | |
| मो.नं- ८८५६८०१२२९ | |

**जाहीर प्रगटन**

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्रारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi -११००३३, यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिति व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १३९/५ मधील क्षेत्र ०.६७ हे. ही जमीन लालू रामा कापावार यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत.

सबब हेजाहीर प्रगटन.

| तर्फे | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| अ‍ॅड. बी. डी. कुलकर्णी | BHARAT SMARTEK PRIVTE LIMITED |
| मंजुळा नगर, भोकर, | डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली. |
| ता. भोकर, जि.नांदेड | |
| मो.नं- ८८५६८०१२२९ | |

**जाहीर प्रगटन**

सर्व संबंधित व सर्वसामान्य जनतेस या जाहीर प्रगटनाद्रारे कळविण्यात येते की, माझे पक्षकार BHARAT SMARTEK PRIVATE LIMITED, Plot No. C-13, G.T. Karnal Road, SMA Industrial Area, New Delhi, District North West Delhi, State Delhi -११००३३, यांच्या वतीने तसेच त्यांचे संचालक डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली यांनी दिलेल्या माहिति व अधिकारावरून हे जाहीर प्रगटन देण्यात येत आहे.

माझे पक्षकार यांनी मौजे तळेगाव, ता. उमरी, जि. नांदेड येथील गट क्रमांक १३९/४ मधील क्षेत्र ०.७७ हे. ही जमीन सुनिता दत्ता गोटमुखले यांच्या मालकी हक्कातील व ताब्यातील असून, सदर जमीन कायमस्वरूपी खरेदी करण्याचे ठरवले असून त्याबाबतचा व्यवहार निश्चित करण्यात आलेला आहे.

तरी सदर शेतजमिनीबाबत कोणाचाही कोणत्याही प्रकारचा हक्क, हिस्सा, वारस हक्क, दावा, आक्षेप, बोजा, तारण, गहाण, कर्ज, करार, इसारपावती, कुळहक्क, भाडेपट्टा, रास्ता हक्क, न्यायालयीन वाद अथवा अन्य कोणताही कायदेशीर हक्क असल्यास त्यांनी हे जाहीर प्रगटन प्रसिद्ध झाल्यापासून ०७ (सात) दिवसांच्या आत संपूर्ण कागदपत्रांसह खालील नमूद पत्त्यावर लेखी स्वरूपात कळवावे अन्यथा निर्धारित मुदतीत कोणताही दावा अथवा आक्षेप प्राप्त न झाल्यास सदर मालमत्तेबाबत कोणाचाही हक्क अथवा आक्षेप नाही असे समजून माझे पक्षकार पुढील खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मुदतीनंतर प्राप्त होणारे कोणतेही दावे अथवा आक्षेप ग्राह्य धरले जाणार नाहीत.

सबब हेजाहीर प्रगटन.

| तर्फे | जाहीर प्रगटन देणार |
|---|---|
| अ‍ॅड. बी. डी. कुलकर्णी | BHARAT SMARTEK PRIVTE LIMITED |
| मंजुळा नगर, भोकर, | डायरेक्टर आशीष सिंघल, रा. दिल्ली. |
| ता. भोकर, जि.नांदेड | |
| मो.नं- ८८५६८०१२२९ | |


## कुत्रीचे पिल्ले विकणे आहे

डॉबर मॅन, जर्मन शेफर्ड, ग्रॅडन, लेबरा डॉग, पामोलियन इत्यादी १२० प्रकारच्या जातीची कुत्रीचे पिल्ले मिळतील.



संपर्क गोपालअण्णा
डॉग डिलर
मोबाईल नंबर
९८५०६८८५२८

**रामबाण ईलाज**

वात रोगावर, गुडघेदुखी, संधीवात, आमवात, मनक्यात गॅप येणे, नस दबणे यावर खात्रीशीर ईलाज.

:: पत्ता ::

**सेवा क्लिनीक**

गणराज फर्निचरच्या बाजुला मेन रोड तुप्पा पाटी, नांदेड -९

संपर्क : डॉ. सय्यद ताहेर, मो. ९६७३५५१९००, ९७६७७१९१०१

तसेच दवाखान्यात बीएएमएस महिला डॉक्टरची नेमणूक करणे आहे.

**गोदातीर समाचार**

**पेस्टोमॅटीक कंट्रोल सर्व्हीस**

हर्बल ट्रिटमेंट

१६ वर्षांपासून नांदेडकरांच्या सेवेत...



किडे, मुंग्या, मुंगळे, झुरळ, पाल, उंदीर, ढेकून, साप, कबुतर, वाळवी, मधपोळे इत्यादींचा खात्रीशीर उपाय. कामाचा कुठलाही साईड इफेक्ट नाही. त्रास नाही, वास नाही.

पूर्णा रोड, बी.एस.एन.एल. ऑफिससमोर नांदेड

मो. 9284804221, 9637704308



# स्वच्छ रस्त्यावर कचरा टाकून पालकमंत्र्यांच्या हस्ते स्वच्छता!

## शाश्वत स्वच्छतेसाठी नागरिकांचा सक्रिय सहभाग आवश्यक -पालकमंत्री अतुल सावे

**नांदेड (प्रतिनिधी) –** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाचे औचित्य साधून आणि पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या वाढदिवसानिमित्त नांदेड महापालिकेच्या वतीने 'स्वच्छ नांदेड, सुंदर नांदेड' स्वच्छता मोहिमेला सुरुवात करण्यात आली. मात्र, या मोहिमेच्या शुभारंभाच्यावेळीच स्वच्छ असलेल्या रस्त्यावर मुद्दाम कचरा टाकून पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते स्वच्छता करण्यात आल्याचा आरोप होत आहे. त्यामुळे महापालिकेच्या या मोहिमेवर प्रश्नचिन्ह उपस्थित होत आहे.



नांदेड शहरातील डॉ. शंकरराव चव्हाण यांच्या पुतळा परिसरातून मराठवाडा मुक्ती संग्राम दिनापासून या स्वच्छता मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला. ज्या ठिकाणी स्वच्छता मोहीम राबवायची होती, त्याच ठिकाणी महापालिका कर्मचाऱ्यांनी आधीच कचरा आणून टाकल्याचा आरोप प्रत्यक्षदर्शींनी केला आहे. त्यानंतर याच कचऱ्याची स्वच्छता करत पालकमंत्री अतुल सावे आणि खासदार अशोक चव्हाण यांच्या हस्ते मोहिमेचा शुभारंभ करण्यात आला.

स्वच्छ भारताची संकल्पना प्रत्यक्षात आणण्यासाठी केवळ शासकीय यंत्रणेचा सहभाग पुरेसा नसून, स्वच्छतेची चळवळ लोकचळवळ बनणे आवश्यक आहे. शाश्वत स्वच्छतेसाठी प्रत्येक नागरिकाने स्वच्छतेची जबाबदारी स्वीकारून सक्रिय सहभाग नोंदवावा, असे आवाहन पालकमंत्री अतुल सावे यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त माता गुजरीजी विसावा उद्यान येथे आयोजित शासकीय ध्वजारोहण कार्यक्रमप्रसंगी पालकमंत्री अतुल सावे यांच्या हस्ते 'स्वच्छता ही सेवा-२०२६' अभियानाचा जिल्हास्तरीय शुभारंभ करण्यात आला. 'स्वच्छतेमध्ये सहभाग, स्वच्छ भारत विकसित भारत' या यंदाच्या संकल्पनेवर आधारित हे अभियान १७ सप्टेंबर ते २ ऑक्टोबर या कालावधीत जिल्ह्यात व्यापक स्वरूपात राबविण्यात येणार आहे.

यावेळी महाराष्ट्राचे माजी मुख्यमंत्री तथा खासदार अशोक चव्हाण, खासदार प्रा.रवींद्र चव्हाण, महापौर कविता मुळे, आ. भीमराव केराम, आ. बालाजी कल्याणकर, आ. अमरनाथ राजूरकर, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील, जिल्हा पोलीस अधीक्षक डॉ. नीलाभ रोहन, महानगरपालिका आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांच्यासह विविध विभागांचे अधिकारी, लोकप्रतिनिधी आणि मान्यवर उपस्थित होते.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त महापालिकेत महापौर कविता मुळे यांच्या हस्ते ध्वजारोहण संपन्न

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या ७८ व्या वर्धापन दिनानिमित्त बुधवार, दि. १७ सप्टेंबर रोजी सकाळी ८.०५ वाजता महापौर कविता मुळे यांच्या हस्ते महापालिकेच्या मुख्य प्रशासकीय इमारतीच्या आवारात ध्वजारोहण समारंभ पार पडला. यावेळी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांची प्रमुख उपस्थिती होती.

समारंभासाठी महापालिकेचे अधिकारी व कर्मचारी हे राष्ट्रीय पोषाखात उपस्थित होते. ध्वजारोहण संपन्न झाल्यावर मनपा शाळेतील विद्यार्थ्यांनी व उपस्थितांनी सामूहिक राष्ट्रगान, राष्ट्रगीत, महाराष्ट्र राज्य गीत व मराठवाडा गीत गायले तसेच पोलीस दलाने व अग्निशमन दलाने झेंड्यास सलामी दिली.

ध्वजारोहणानंतर महापौर सौ. मुळे यांनी उपस्थितांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. आपल्या संदेशात त्या म्हणाल्या, मराठवाड्याला निजामाच्या अन्यायी राजवटीतून मुक्त करण्यासाठी अनेक स्वातंत्र्यसैनिकांनी आपल्या प्राणांची आहुती दिली. त्यांच्या या त्यागामुळेच आज आपण



स्वतंत्र वातावरणात आहोत. या हुतात्म्यांचे बलिदान कधीही विसरता येणार नाही. त्यांच्या स्वप्नातील समृद्ध आणि विकसित शहर घडवण्यासाठी महापालिका कटिबद्ध आहे.

याप्रसंगी मनपा आयुक्त डॉ. महेशकुमार डोईफोडे यांनीही उपस्थित सर्वांना मराठवाडा मुक्ती संग्राम दिनाच्या शुभेच्छा दिल्या. शहराच्या विकासासाठी आणि नागरिकांना उत्तम सोयी- सुविधा पुरवण्यासाठी प्रशासन सदैव तत्पर राहील, असा विश्वास यावेळी व्यक्त करण्यात आला.

याप्रसंगी मनपाचे उपमहापौर दीपकसिंह रावत, स्थायी समिती सभापती विरेंद्रसिंग गाडीवाले, सभागृह नेता महेश कनकदंडे, शिक्षण, महिला व बाल कल्याण सभापती सदिच्छा सोनी, उपभापती निरंजना लांडगे, गटनेता संदीपसिंग गाडीवाले, मसूद खान, प्रशांत इंगोले, साबेर चाऊस, किशोर स्वामी, माजी पदाधिकारी व सदस्य, अतिरिक्त आयुक्त निलेश सुंकेवार, अतिरिक्त आयुक्त गिरीश कदम, उपायुक्त अभिजीत वायकोस, नितीन गाढ़वे, स. अजितपालसिंघ संधु, गंगाधर ईरलोड, मुख्य लेखा व वित्त अधिकारी धनराज पांडे, शहर अभियंता सुमंत पाटील, नगरचनाकार ओम लहाने, कार्यकारी अभियंता संघरत्न सोनसळे, दिलीप टाकलीकर, वैद्यकीय आरोग्य अधिकारी डॉ. हनुमंत रिट्ठे, सहाय्यक आयुक्त मो.गुलाम सादेक, क्रीडा अधिकारी रमेश चौरे, पशुवैद्यकीय अधिकारी डॉ.रईसोद्दीन, सिस्टीम मॅनेजर सदाशिव पतंगे, मुख्य उद्यान अधिक्षक डॉ. मिर्झा फरहतुल्ला बेग,शिक्षण अधिकारी प्रविणा मांदळे, उपअभियंता प्रकाश कांबळे, जनसंपर्क अधिकारी सुमेध बनसोडे तसेच महापालिकेतील ईतर अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते.

# नांदेड विभागात तिकीट तपासणी मोहीम; ५४० प्रकरणांत ३ लाखांचा दंड वसूल

**नांदेड (प्रतिनिधी)–** प्रवाशांनी वैध तिकीट घेऊनच प्रवास करावा आणि रेल्वेच्या महसुलाचे संरक्षण व्हावे, यासाठी नांदेड रेल्वे विभागाच्या वतीने दि. १५ सप्टेंबर रोजी विशेष तिकीट तपासणी मोहीम राबविण्यात आली.

पहाटे ४.३० ते रात्री ८ वाजेपर्यंत राबविण्यात आलेल्या या मोहिमेचे निरीक्षण सहायक वाणिज्य व्यवस्थापक शैलेश कुमारसिंह यांनी केले. यात एकूण ३१ तिकीट तपासणी कर्मचाऱ्यांनी सहभाग घेत २६ रेल्वेगाड्यांची तपासणी केली.

या मोहिमेदरम्यान एकूण ५४० प्रकरणे उघडकीस आली असून त्यातून ३ लाख १ हजार ७५० रुपयांचा महसूल वसूल करण्यात आला आहे.

प्रकारनिहाय कारवाईचा तपशील – तिकीटविना प्रवास : ३१३ प्रकरणे – भाडे ८७,८६० रु. + दंड १,५७,२६५ रु. अनियमित प्रवास : ३१ प्रकरणे – भाडे ४,००५ रु. + दंड १५,५०० रु. विनाबुक सामान :१९६ प्रकरणे – वसूल रक्कम ३७,१२० रुपये असे एकूण ५४० प्रकरणे, वसूल रक्कम ३ लाख १ हजार ७५० रुपये.

प्रवासापूर्वी वैध तिकीट घ्यावे, तिकीटावर वर्ग, गंतव्यस्थान आणि प्रवासी संख्या योग्य असल्याची खात्री करावी. जादा सामान असल्यास नियमानुसार बुक करूनच प्रवास करावा. तिकीट खरेदीसाठी अधिकृत खिडक्या, अधिकृत ऑनलाईन व डिजिटल माध्यमांचाच वापर करावा, असे आवाहन रेल्वे प्रशासनाने केले आहे.

# मराठवाडा मुक्ती संग्राम दिन; जिल्हा परिषदेत मुख्य कार्यकारी अधिकारी महेश पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण

**नांदेड (प्रतिनिधी)–** मराठवाडा मुक्ती संग्राम दिनानिमित्त नांदेड जिल्हा परिषदेच्या प्रांगणात मुख्य कार्यकारी अधिकारी तथा प्रशासक महेश पाटील यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. यावेळी राष्ट्रध्वजाला सलामी देऊन अभिवादन करण्यात आले.

या प्रसंगी अतिरिक्त मुख्य कार्यकारी अधिकारी परीक्षित यादव, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक डॉ. संजय तुबाकले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी राजकुमार मुक्कावार, मुख्य लेखा व वित्त अधिकारी महेश देशमुख, जिल्हा



आरोग्य अधिकारी डॉ. संतोष नवले, उपमुख्य कार्यकारी अधिकारी डी. बी. गिरी, प्रशांत थोरात, अमित राठोड, पशुसंवर्धन व दुग्धव्यवसाय विभागाचे जिल्हा आयुक्त एस. बी. खुणे, सहायक आयुक्त डॉ. प्रवीणकुमार घुले, कृषी अधिकारी डॉ. निलकुमार ऐतवडे, कार्यकारी अभियंता राहुल रावसाहेब, खराडे यांच्यासह जिल्हा परिषदेचे विविध विभागांचे अधिकारी, कर्मचारी तसेच शालेय विद्यार्थी उपस्थित होते. या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन पद्माकर कुलकर्णी व मिलिंद व्यवहारे यांनी केले.

# नांदेड पोलिसांचा गुंडांना दणका; एमपीडीएअंतर्गत २ सराईत गुन्हेगारांची थेट कारागृहात रवानगी

**नांदेड (प्रतिनिधी)–** आगामी सण-उत्सवांच्या पार्श्वभूमीवर जिल्ह्यात कायदा व सुव्यवस्था अबाधित राखण्यासाठी नांदेड पोलीस दलाने सराईत गुन्हेगारांविरुद्ध धडक मोहीम हाती घेतली आहे. पोलीस अधीक्षक डॉ. निलाभ रोहन यांच्या संकल्पनेतून राबविण्यात येत असलेल्या '२+ स्कीम' (दोन किंवा त्यापेक्षा अधिक गंभीर गुन्हे दाखल असलेल्या गुन्हेगारांची यादी) अंतर्गत दोन कुख्यात गुन्हेगारांवर MPD कायद्यांतर्गत स्थानबद्धतेची कारवाई करण्यात आली आहे.

ही या वर्षातील १९ वी आणि २० वी एमपीडीए कारवाई आहे. यापूर्वीच जिल्ह्यातील १५० हून अधिक सराईत गुन्हेगारांना पोलिसांनी रडारवर घेतले असून त्यांच्यावरही मोक्का, तडीपारी आणि MPD सारख्या कडक कारवाया प्रस्तावित आहेत. निवृत्ती उर्फ निलेश रावसाहेब गोरठेकर (वय २५, रा. दयानंद नगर, नवीन मोंढा, सध्या गौरव हाईट्स, बाबानगर, नांदेड) याच्यावर खून, खुनाचा प्रयत्न, गंभीर दुखापत, जबरी चोरी, बेकायदेशीर अग्निशस्त्रे बाळगून दहशत पसरवणे, घरफोडी असे एकूण ८ गंभीर गुन्हे विविध पोलीस ठाण्यांत दाखल आहेत.

# वर्षा बंगल्यावर आ. प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते गणरायाची आरती

**मुंबई/नांदेड (प्रतिनिधी)–** मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मुंबईतील वर्षा या शासकीय निवासस्थानी गणरायाचे मनोभावे दर्शन घेतल्यानंतर आमदार प्रतापराव पाटील चिखलीकर यांच्या हस्ते आरती करण्यात आली. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत झालेल्या या मंगलमय सोहळ्यात गणरायाची विधिवत पूजा-अर्चा करण्यात आली.

यावेळी आमदार अक्षय कर्डिले, आमदार शेखर शेखावत, आमदार अनिल पाटील, आमदार गोपीचंद पडळकर, आमदार सदाभाऊ खोत, आमदार बापूसाहेब पठारे, आमदार योगेश टिळेकर यांच्यासह अन्य मान्यवर उपस्थित होते.

गणरायाच्या आरतीनंतर उपस्थितांनी राज्याच्या सुख-समृद्धीसाठी प्रार्थना केली. या प्रसंगी मुख्यमंत्री फडणवीस आणि उपस्थित



आमदारांनी एकमेकांना गणेशोत्सवाच्या शुभेच्छा दिल्या.

# हुतात्म्यांचे शौर्य आणि त्याग नव्या पिढीला दिशा देणारी ऊर्जा -नरेंद्र चव्हाण

**नांदेड (प्रतिनिधी) –** हुतात्म्यांचे शौर्य आणि त्याग हा केवळ इतिहासाचा भाग नसून, नव्या पिढीला दिशा देणारी ऊर्जा आहे. मराठवाड्याला स्वातंत्र्य सहजासहजी मिळाले नसून स्वातंत्र्यसैनिक आणि हुतात्म्यांच्या शौर्यामुळे व बलिदानामुळे १७ सप्टेंबर १९४८ रोजी मराठवाडा निजामाच्या राजवटीतून मुक्त झाला. त्यांच्या त्यागातून प्रेरणा घेऊन नव्या पिढीने देशाच्या विकासात योगदान द्यावे, असे प्रतिपादन भाऊराव चव्हाण सहकारी साखर कारखान्याचे संचालक तथा स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा



विद्यापीठाचे सिनेट प्रतिनिधी नरेंद्र चव्हाण यांनी केले.

मराठवाडा मुक्तिसंग्राम दिनानिमित्त मुदखेड तालुक्यातील बारड येथे केंद्रीय संचार ब्यूरो आणि ग्रामपंचायतीच्या वतीने आयोजित विशेष कार्यक्रमात ते बोलत होते. बारड येथील हुतात्मा स्मारक परिसरात दीपप्रज्वलन करून कार्यक्रमाचे उद्घाटन करण्यात आले.

यावेळी नरेंद्र चव्हाण, माजी उपसरपंच बाळासाहेब देशमुख बारडकर, केंद्रीय संचार ब्यूरोचे प्रसिद्धी प्रमुख सुमित दोडल, ग्रामविकास अधिकारी सतीश लाठकर, सुनील देशमुख, प्रदीप भोसीकर आदी मान्यवर उपस्थित होते.

आजच्या काळात तरुणांनी शिक्षण, तंत्रज्ञान आणि समाजसेवेच्या माध्यमातून देशाच्या विकासात योगदान दिले पाहिजे. भौतिक प्रगती मोठ्या प्रमाणात झाली असली तरी इतिहासातील शौर्य आणि त्यागापासून प्रेरणा घेऊन सामाजिक, आर्थिक आणि वैचारिक आव्हानांना सामोरे जाण्याचे धैर्य तरुणांनी दाखविले पाहिजे, असे नरेंद्र चव्हाण यावेळी म्हणाले.

# इंजि. तानाजी हुस्सेकर 'उत्कृष्ट अभियंता' पुरस्काराने सन्मानित



**नांदेड (प्रतिनिधी)–** स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठाचे कार्यकारी अभियंता तथा छावा मराठा संघटनेचे प्रदेश कार्याध्यक्ष इंजि. तानाजी हुस्सेकर यांना महाराष्ट्र इंजिनियर्स असोसिएशन (नांदेड शाखा) तर्फे 'उत्कृष्ट अभियंता पुरस्कार २०२५-२०२६' जाहीर झाला आहे. अभियांत्रिकी क्षेत्रातील उल्लेखनीय कामगिरी, जलसंधारणातील क्रांतिकारी काम आणि सामाजिक बांधिलकीची दखल घेऊन हा सन्मान जाहीर करण्यात आला आहे.

इंजि. तानाजी हुस्सेकर यांनी स्वारातीम विद्यापीठात 'हरित विद्यापीठ' ही संकल्पना प्रत्यक्ष साकारताना जलसंधारणाचे विविध प्रकल्प यशस्वीरीत्या राबवले आहेत. मराठवाड्यासारख्या दुष्काळी भागात पाण्याचा प्रत्येक थेंब जिरवणारे हे प्रकल्प विद्यापीठासाठी जीवनदायी ठरले आहेत. तसेच केंद्र सरकारच्या 'PM-USH' समितीवर मार्गदर्शक म्हणून काम करताना विविध महाविद्यालयांमधील उच्च शिक्षणाचा दर्जा उंचावणे आणि तांत्रिक सोयी-सुविधांचा कायापालट करण्यात त्यांचा मोठा वाटा राहिला आहे. प्रशासकीय जबाबदारी सांभाळतानाच 'छावा मराठा संघटने'च्या माध्यमातून उपेक्षित घटकांच्या प्रश्नांवर व्यावहारिक व तांत्रिक मार्ग शोधणारा एक 'सोशल इंजिनिअर' म्हणून त्यांनी आपली ओळख निर्माण केली आहे.

तंत्रज्ञान आणि सामाजिक जाणिवेचा मेळ घालत केलेल्या या उल्लेखनीय कार्याबद्दल महाराष्ट्र इंजिनियर्स असोसिएशनतर्फे हा गौरव करण्यात येत असून, त्यांच्या या यशाबद्दल शैक्षणिक, सामाजिक आणि अभियांत्रिकी क्षेत्रातून त्यांच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत आहे.

# 'स्वरगंध'च्या संगीतमय कार्यक्रमास श्रोत्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

**नांदेड (प्रतिनिधी)–** येथील डॉ. शंकरराव चव्हाण सभागृह, नांदेड येथे लक्ष्मीकांत लिंगाडे प्रस्तुत स्वरगंध संगीत मंच नांदेडच्या वतीने 'एक शाम सुरीले गीतों के नाम' या संगीतमय कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते.

या कार्यक्रमाचे उद्घाटक म्हणून उद्योजक अनिल शेटकार, दै. 'गोदातीर समाचार'चे मुख्य संपादक केशव घोणसे पाटील, प्रसिद्ध व्यापारी तथा गायक राजेंद्र हुरणे या मान्यवरांची उपस्थिती होती.

या कार्यक्रमात प्रामुख्याने साईनाथ लिंगाडे, शिवाजी टाक, लक्ष्मीकांत लिंगाडे, संतोष टाक, गोविंद कंधारे, नरेंद्र केजकर, गणेश नाईकवाडे, डॉ. चंद्रशेखर



किसवे, डॉ. राजीव राठोड, डॉ. विनोद केजकर, ललिता दुलगच, अनुराधा पांडे, राजेश्वरी होट्टे, मंदाकिनी गाडेकर या गायक, गायिकांचा सहभाग होता. तसेच डॉ. विद्याश्री येमचे हिच्या बहारदार नृत्याचे सादरीकरण देखील या कार्यक्रमाचे वैशिष्ट्य ठरले.

साईनाथ लिंगाडे यांची निर्मिती असलेल्या या कार्यक्रमाचे आयोजन लक्ष्मीकांत लिंगाडे यांनी केले. कार्यक्रमाची संकल्पना अंबादास पार्डीकर यांची होती तर सहनिर्मितीमध्ये शिवाजी टाक व संतोष टाक यांचा सहभाग होता. नवोदित कलाकारांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देत येथील स्वरगंध संगीत मंचच्या वतीने नवीन व जुन्या कलावंतांना सोबत घेऊन पार पडलेल्या या संगीतमय कार्यक्रमास प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात मराठी चित्रपटातील धमाकेदार, सुप्रसिद्ध गीतांसह हिंदी चित्रपटातील जुन्या व नवीन सदाबहार गीतांचे सादरीकरण करण्यात आले.

संजय काचावार व दीपाली चौधरी यांनी सूत्रसंचालनाची बाजू सांभाळली. यावेळी प्रदीप सूर्यवंशी यांनी या कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी घेतलेल्या परिश्रमाबद्दल तसेच सभागृहाच्या प्रवेशद्वाराजवळ मुनीराज पैठने यांनी काढलेल्या मनमोहक अशा रांगोळीच्या सजावटीबद्दल त्यांचा सन्मान करण्यात आला.

**Godateer Samachar** हे पत्र गोदातीर मीडिया नेटवर्ककरिता मुद्रक, प्रकाशक, संपादक केशव मधुकरराव घोणसे पाटील यांनी सेवा कम्युनिकेशन, १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे मुद्रित करुन १०२ सी, सहकारी औद्योगिक वसाहत, शिवाजीनगर, नांदेड-४३१६०२ येथे प्रकाशित केले. **संपादक** केशव मधुकरराव घोणसे पाटील.

फोन नं.(०२४६२) २५५७७७/फॅक्स नांदेड-(०२४६२) २५२२११ / लातूर (०२३८२)२५७४७४

ईमेल: godateer@gmail.com, keshavgpatil@gmail.com